रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ३४०
www.ramprahar.com

बुधवार, २८ जून २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

पुण्यात एकतर्फी प्रेमातून तरुणीवर कोयत्याने हल्ला/२

अंडा पॉईंट, मॅजिक पॉईंट येथे जास्त उंच वाहनांना बंदी/५

राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडला दोन पदके/८

## राज्यसभेच्या १० जागांसाठी निवडणूक जाहीर

**नवी दिल्ली** : निवडणूक आयोगाने मंगळवारी (दि. २७) राज्यसभेच्या गोवा, गुजरात आणि पश्चिम बंगालमधील एकूण १० जागांसाठी निवडणूक जाहीर केली. यात प. बंगालमधील सहा, गुजरातमधील तीन आणि गोव्यातील एकाचा जागेचा समावेश आहे. यासाठी १३ आणि २४ जुलै रोजी मतदान होणार असून मतमोजणी २४ जुलैलाच होणार आहे. गोव्यातील विनय तेंडुलकर यांचा कार्यकाळ २८ जुलै रोजी संपत आहे. गुजरातमधील परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, दिनेश जेमलभाई अनावडिया आणि जुगलसिंग माथुर्जी यांचा कार्यकाळ १८ ऑगस्ट रोजी संपतोय; तर प. बंगालमधील डेरेक ओब्रायन, डोला सेन, प्रदीप भट्टाचार्य, सुष्मिता देव, शांता छेत्री आणि सुखेंदू शेखर रे यांचाही कार्यकाळ १८ ऑगस्टला संपत आहे. प. बंगालमध्ये लुझिन्हो जोआकिम फालेरो यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या जागेवरही निवडणूक होणार आहे.

# पाटण्यात भ्रष्टाचाऱ्यांची हातमिळवणी

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विरोधकांवर हल्लाबोल



**भोपाळ : वृत्तसंस्था**

परदेश दौऱ्यावरून भारतात परतलेले पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मंगळवारी (दि. २७) मध्य प्रदेशची राजधानी भोपाळमध्ये 'मेरा बूथ सबसे मजबूत' या कार्यक्रमांतर्गत पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित केले. या वेळी त्यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला. पाटण्यातील बैठकीत सर्व भ्रष्टाचाऱ्यांनी हातमिळवणी केली. घोटाळाविरोधी कारवाईतून विरोधी पक्ष पळून जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. भ्रष्ट नेते एकमेकांना वाचवण्याचा प्रयत्न करताहेत. मी तुम्हाला हमी देतो की, त्यांच्यापैकी कुणालाही सोडणार नाही, असा इशाराही पंतप्रधान मोदींनी या वेळी दिला.

भाजपची सर्वांत मोठी शक्ती म्हणजे त्यांचे कार्यकर्ते आहेत. आज या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल मी राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांचे आभार मानतो. याद्वारे मी भाजपच्या सुमारे १० लाख बूथ कार्यकर्त्यांना संबोधित करू शकलो. इतिहासात राजकीय पक्षाचा असा एकही कार्यक्रम आजवर झालेला नाही. तुम्ही केवळ भाजपचेच नाही, तर देशाचे संकल्प पूर्ण करण्यासाठी एक मजबूत सैनिकही आहात, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

या वेळी पंतप्रधान मोदींनी बूथचे महत्त्व समजावून सांगितले. बूथ हा आपल्यातच एकोपा असलेला घटक आहे. **(पान २ वर..)**

### एका घरात दोन कायदे कशाला?

पंतप्रधान नरेंद्र मोदी या वेळी म्हणाले, की समान नागरी कायद्याबद्दल लोक चुकीच्या अफवा पसरवत आहेत. एका कुटुंबामध्ये प्रत्येकासाठी वेगवेगळे नियम असतील, तर ते कुटुंब पुढे कसे जाईल? ज्याप्रमाणे दोन कायद्यांनी घर चालू शकत नाही, त्याचप्रमाणे देशही दोन कायद्याने चालू शकत नाही. देशात समान नागरी कायदा लागू व्हावा यासाठी सर्वोच्च न्यायालय प्रयत्न करीत आहे, मात्र व्होटबँकसाठी काही लोक या कायद्याला विरोध करीत आहेत.



## पनवेल मनपा क्षेत्रातील मुस्लीम, ख्रिश्चन, बोहरी समाजाच्या दफनभूमीचा प्रश्न मार्गी

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीला आयुक्तांचा सकारात्मक प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मुस्लीम, ख्रिश्चन आणि बोहरी समाजाच्या दफनभूमीचा अनेक वर्षे प्रलंबित असलेला प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने मार्गी लागला आहे. याबाबत तिन्ही समाजांच्या प्रतिनिधींची बैठक सोमवारी (दि. २६) आयुक्त गणेश देशमुख यांच्या दालनात झाली. या वेळी आयुक्तांनी दफनभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीस माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक नितीन पाटील, अजय बहिरा, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, कळंबोलीतील भाजप युवा कार्यकर्ते जमीर शेख यांच्यासह मुस्लीम, ख्रिश्चन आणि बोहरी या तिन्ही समाजांचे पदाधिकारी उपस्थित होते. **(पान २ वर..)**



*समाजाला दफनभूमीसाठी जागा उपलब्ध व्हावी याकरिता दीड वर्षापूर्वी आमदार प्रशांत ठाकूर यांना विनंती केली होती. याबाबत त्यांनी तत्काळ सभागृह नेते परेश ठाकूर यांना पाहणी करायला सांगितले. त्यानुसार पाहणी होऊन तुमची मागणी रास्त आहे, आम्ही यासाठी प्रयत्न करू, असा शब्द परेश ठाकूर यांनी दिला होता. याकामी आमदार प्रशांत ठाकूर व परेश ठाकूर यांनी पाठपुरावा केला. त्याला यश आले आहे. दफनभूमीच्या जागेबाबत आयुक्तांनी आश्वासन दिले आहे. याबद्दल मी आमदार प्रशांत ठाकूर व परेश ठाकूर यांचे आभार मानतो.*

**–बशीर शेख,** *उपाध्यक्ष, खैरूल इस्लाम ट्रस्ट, कळंबोली तथा माजी सदस्य, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी*

## 'मेरा बूथ, सबसे मजबूत' करण्यासाठी सज्ज व्हा -आमदार प्रशांत ठाकूर





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मेरा बूथ, सबसे मजबूत या कार्यक्रमाच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचे आयोजन पनवेल तालुका व शहर भाजपच्या कार्यालयात करण्यात आले होते. या वेळी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षाचे कार्य घराघरापर्यंत पोहचवून मेरा बूथ सबसे मजबूत करण्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना केले.

या कार्यक्रमास भाजपचे जिल्हा सरचिटणीस अविनाश कोळी, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, पनवेल विधानसभा निवडणूक प्रमुख तथा जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, मनोहर म्हात्रे, मुकीत काझी, माजी नगरसेविका नीता माळी, राजश्री वावेकर, रूचिता लोंढे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, प्रवीण खंडागळे, माजी पं. स.चे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, दिनेश खानावकर, प्रवीण मोहकर यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### हेलिकॉप्टरचे इमर्जन्सी लँडिंग; सीएम ममता बॅनर्जी जखमी

**कोलकाता** : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी मंगळवारी (दि. २७) जलपाईगुडी येथून बागडोगरा येथे जात असताना खराब हवामानामुळे सालुगाडा येथील आर्मी एअरबेसवर त्यांच्या हेलिकॉप्टरचे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. या वेळी हेलिकॉप्टरला झटके बसल्याने बॅनर्जी जखमी झाल्या आहेत. त्यांना कोलकाता येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

### बीएमसी अधिकारी मारहाण; परबांसह पाच जणांवर गुन्हा

**मुंबई** : वांद्रे येथील महापालिका अधिकाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांच्यासह पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील चार जणांना अटक झाली असून त्यांना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे, तर परब यांची अटक टळली आहे.

### रायगडचे पर्जन्यमान

**२४ तासांतील पाऊस : ५१.८३ मिमी**
**एकूण पाऊस : २७४.५३ मिमी**

## मुंबई-गोवा वंदे भारत ट्रेनचा पंतप्रधानांच्या हस्ते शुभारंभ; पनवेलमध्ये जोरदार स्वागत





**मुंबई : प्रतिनिधी**

देशवासीयांना एकाच दिवशी पाच वंदे भारत ट्रेनची भेट मिळाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (दि. २७) मडगाव (गोवा)–मुंबई, भोपाळ–इंदौर, भोपाळ–जबलपूर, रांची–पाटणा आणि धारवाड–बंगळुरू अशा पाच वंदे भारत रेल्वेगाड्यांना भोपाळ येथील राणी कमलापती रेल्वेस्थानकावरून हिरवा झेंडा दाखविला.

या सोहळ्याला रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यासह देशातील वंदे भारत गाड्यांची संख्या आता एकूण २३ झाली आहे. मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत साकारण्यात आलेली ही ट्रेन पूर्णपणे स्वदेशी बनावटीची आहे.

दरम्यान, मडगाव (गोवा)–मुंबई वंदे भारत रेल्वेगाडी पनवेल रेल्वेस्थानकावर आल्यावर राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आदींनी हिरवा झेंडा दाखवून स्वागत केले.

## रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यात पुढील तीन दिवस अतिवृष्टी होण्याचा इशारा प्रादेशिक हवामान खात्याने दिला आहे. त्यामुळे समुद्र व नदी किनाऱ्यांवरील गावांना सतर्कतेच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

दोन ते तीन दिवस किनारपट्टीवरील भागात ताशी ५५ किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. त्यामुळे समुद्र खवळलेला राहिल. मच्छीमारांनी खोल समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील बहुतांश भागात पावसाचा जोर कायम आहे. ठराविक अंतराने पावसाच्या मध्यम ते जोरदार सरी सतत कोसळत होत्या. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. अतिवृष्टीमुळे माणगाव तालुक्यातील लाखपाले येथे दरड कोसळली. त्यामुळे तेथील चार कुटूंबांतील २० जणांना सुरक्षितस्थळी स्थलांतरीत करण्यात आले आहे. याशिवाय जिल्ह्यातील सखल भागात पाणी साचणे, वीजपुरवठा खंडीत होणे यासारख्या घटना घडल्या.

## म्हसळ्यातील कोकबन येथे वादळ; घरांची छपरे उडाली




(छाया : संजय खांबेटे)

**म्हसळा : प्रतिनिधी**

तालुक्यातील दुर्गम भागात वसलेल्या घुम ग्रामपंचायत हद्दीतील कोकबन गावात मंगळवारी (दि. २७) रात्री दीडच्या सुमारास मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वादळी वाऱ्यात २२ घरांच्या छपरांची वाताहत झाली. यामध्ये सुमारे १५ ते २० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

घटनेचे वृत्त समजताच गटविकास अधिकारी बापूसाहेब पोळ, तलाठी पांडुरंग कळंबे, ग्रामसेवक योगेश पाटील, पोलीस पाटील निलेश लटके आदींनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आणि ग्रामस्थांकडून या नैसर्गिक संकटाविषयी माहिती घेतली.

या वेळी दैव बलवत्तर असल्याने कोणतीही जीवित हानी झाली नाही, पण या घटनेत केतन शिंदे, रमेश शिंदे, प्रकाश शिंदे, महेश शिंदे, कृष्णा शिंदे व अन्य १५ जणांच्या घरांचे तसेच सामाजिक सभागृह, अंगणवाडी इमारतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीची भरपाई देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## वनडे वर्ल्डकपचे वेळापत्रक जाहीर

### १५ ऑक्टोबरला भारत–पाकिस्तान सामना

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदा भारताच्या यजमानपदाखाली खेळल्या जाणाऱ्या आयसीसी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचे वेळापत्रक मंगळवारी (दि. २७) भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून (बीसीसीआय) मुंबईत जाहीर करण्यात आले. या स्पर्धेत एकूण १० संघ सहभागी होणार आहेत.

यजमान असल्याने भारताला या स्पर्धेत थेट प्रवेश मिळाला आहे. अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, बांगलादेश, न्यूझीलंड, पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका संघ क्रिकेट विश्वचषक सुपर लीगद्वारे स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.




सध्या झिम्बाब्वे येथे खेळल्या जात असलेल्या विश्वचषक पात्रता फेरीतून आणखी दोन संघ स्पर्धेत प्रवेश करतील.

२०१९च्या अंतिम फेरीच्या पुनरावृत्तीसह ५ ऑक्टोबर रोजी विश्वचषकाला सुरुवात होईल. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात पहिला सामना खेळवला जाणार आहे. यजमान संघ भारत ८ ऑक्टोबर रोजी चेन्नई येथे पाच वेळा विश्वचषक विजेत्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल, तर भारत आणि पाकिस्तानमधील पहिला सामना १५ ऑक्टोबरला अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाईल.

प्रत्येक संघ राऊंड रॉबिन फॉरमॅटमध्ये इतर नऊ संघांशी खेळेल, ज्यात अव्वल चार संघ बाद फेरी आणि उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. पहिला सामना ५ ऑक्टोबर रोजी खेळवण्यात येईल, तर अंतिम सामना रविवारी १९ नोव्हेंबरमध्ये अहमदाबाद येथे होईल.

## गव्हाण विभागातील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

### श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भाजपचा स्तुत्य उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य क्षेत्रात गेली तीन दशके उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भाजप उलवे नोड २ यांच्या संयुक्त विद्यमाने गव्हाण विभागातील गरजू विद्यार्थ्यांना मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २७) मोफत वह्यावाटप करण्यात आले.

या उपक्रमातंर्गत न्हावा राजिप शाळा, न्हावाखाडी राजिप शाळा, शिवाजीनगर राजिप शाळा, कोपर राजिप शाळा, श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन भगत ज्युनिअर महाविद्यालय गव्हाण कोपर येथे, शेलघर राजिप शाळा, कन्या शाळा व गव्हाण राजिप शाळा आणि बेलपाडा राजिप शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या वेळी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांची शैक्षणिक कारकिर्द व दातृत्वाचे दाखले देत विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध करावी, असे आवाहन केले.

या कार्यक्रमांना न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, माजी सरपंच सी. सी. भोईर, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, माजी सरपंच हेमलता भगत, ज्येष्ठ नेते तथा माजी पंचायत सदस्य भाऊशेठ पाटील, अनंताशेठ ठाकूर, जयवंत देशमुख, विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य सदस्य योगिता भगत, कामिनी कोळी, उषा देशमुख, सुनिता घरत, **(पान २ वर..)**

# मोदी सरकारचे कार्य घरोघरी पोहचवा

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

मोदी सरकारच्या गरीब कल्याण कार्यक्रमातून उंचावलेले जीवनमान, सर्वसमावेशक विकासामुळे जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी भारताची अर्थव्यवस्था याची माहिती भाजप कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी घरोघरी जाऊन पोहचविली पाहिजे, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. २७) केले. भोपाळ येथून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १० लाख बूथवरील कार्यकर्त्यांना ऑनलाईन मार्गदर्शन केले. त्यानिमित्त भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.



या कार्यक्रमास महिला व बालविकासमंत्री मंगलप्रभात लोढा, प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, विक्रांत पाटील, मुरलीधर मोहोळ, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ आदी उपस्थित होते. पक्षाच्या घर चलो अभियानात आपण स्वतः ५०० घरी जाणार असून प्रत्येकाने या अभियानासाठी वेळ काढलाच पाहिजे, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मोदी सरकारच्या नवव्या वर्षपूर्तीनिमित्त आखलेल्या उपक्रमाचा एक भाग म्हणून मेरा बूथ सबसे मजबूत या अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एकाच वेळी १० लाख बूथवरील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत एक इतिहास रचला आहे. उत्तरदायित्वाच्या भावनेतून मोदी सरकारने राबविलेल्या लोकोपयोगी योजनांची माहिती जनसंवादाच्या माध्यमातून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न पक्षाचे कार्यकर्ते करीत आहेत, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मोदी सरकारच्या काळात गरीब कल्याण योजनांचे लाभ गरजूंपर्यंत पोहचत आहेत. पायाभूत सुविधा विकासाचे महत्त्व जाणून सरकारने अशा योजनांसाठी १० लाख कोटींची भरीव तरतूद केली आहे. मोदी सरकारच्या नियोजनबद्ध विकासकामांमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेची वाटचाल जगातील तिसऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थेच्या दिशेने वेगाने होत आहे, असेही फडणवीस यांनी नमूद केले.

### परदेशात जाऊन नावे ठेवणाऱ्यांना चपराक!

*गेल्या नऊ वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने केलेल्या विकासकामांमुळे जगभरात देशाची मान उंचावली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर जगन्मान्य नेतृत्व म्हणून नरेंद्र मोदी यांच्याकडे पाहिले जाते. हा संपूर्ण देशाचा सन्मान आहे. मोदी सरकारच्या काळात भारतात लोकशाही केवळ नांदतच नाही, तर ती अधिक समृद्ध होत आहे असे प्रशंसा पत्रक अमेरिकेच्या व्हाईट हाऊसमधून प्रसिद्ध करण्यात आले. परदेशात जाऊन लोकशाहीबाबत मोदी सरकारला नावे ठेवणाऱ्यांना ही चपराक आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या वेळी म्हणाले.*

# केसीआर यांनी त्यांचा पक्ष सांभाळावा

## मुख्यमंत्र्यांचे प्रत्युत्तर



**पंढरपूर : प्रतिनिधी**

तेलंगणाचे मुख्यमंत्री केसीआर अर्थात के. चंद्रशेखर राव सध्या सोलापूर, पंढरपूर दौऱ्यावर आहेत. पंढरपुरात त्यांनी मंगळवारी (दि. २७) विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतल्यानंतर जाहीर सभा घेतली. या सभेत भगीरथ भालके यांनी भारत राष्ट्र समितीमध्ये प्रवेश केला. या वेळी बोलताना केसीआर यांनी महाराष्ट्र सरकारवर टीका केली. या टीकेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खोचक प्रत्युत्तर दिले आहे.

लोकशाहीत प्रत्येकाला निवडणूक लढण्याचा अधिकार असतो, पण त्यानंतर मते देण्याचा अधिकार जनतेच्या हातात असतो. पांडुरंगाचे दर्शन घ्यायला के. चंद्रशेखर राव आले. त्यांच्याबद्दल जास्त भाष्य करणे मला उचित वाटत नाही. त्यांनी दर्शन घेतले आणि ते रवाना झाले, असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, त्यांनी आधी त्यांचा पक्ष सांभाळला पाहिजे. दिल्लीत काहीतरी झाले ना? त्यांचा पक्ष दिल्लीत फुटला ना? तो त्यांनी सांभाळावा. त्यांचे राज्य सांभाळावे. त्यांच्या राज्यातल्या लोकांना सुविधा द्याव्यात. महाराष्ट्रात आम्ही समर्थ आहोत. महाराष्ट्र सरकारने गेल्या ११ महिन्यांत जनतेला सोयीसुविधा दिल्या आहेत. सर्व घटकांसाठी कामे केली आहेत. त्यामुळे त्यांची चिंता आम्हाला नाहीये.

दरम्यान, केसीआर यांनी सोलापुरात केलेल्या शक्तीप्रदर्शनावरही एकनाथ शिंदेंनी प्रतिक्रिया दिली. महाराष्ट्रात काय शक्तीप्रदर्शन करणार? इथले लोक महाराष्ट्र सरकारसोबत आहेत. शक्ती तर तिथे तेलंगणामध्ये दाखवायला हवी. त्यामुळे त्यांच्या दौऱ्याची दखल घेण्याची गरज नाहीये, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

दरम्यान, केसीआर यांना भाजपची बी टीम म्हणणाऱ्या विरोधकांना मुख्यमंत्री शिंदेंनी टोला लगावला आहे. विरोधक आधी तर त्यांचे स्वागत करीत होते. त्यांना आमंत्रण देऊन जेवू घालत होते. आता कसे ते बी टीम झाले? ही दुटप्पी भूमिका आहे. केसीआर येवो वा इतर कुणीही येवो. महाराष्ट्रातली जनता समजूतदार आहे. काम करणाऱ्या सरकारच्या पाठिशी ती ठाम आहे, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

# पुण्यात एकतर्फी प्रेमातून तरुणीवर कोयत्याने हल्ला

**पुणे : प्रतिनिधी**

प्रेमप्रकरणातून दर्शना पवार या एमपीएससी उत्तीर्ण तरुणीची हत्या झाल्याचा प्रकार ताजा असतानाच पुण्यात आणखी एक धक्कादायक घटना घडली आहे. शहरातील सदाशिव पेठ भागात भरदिवसा एका तरुणीवर कोयत्याने वार करण्यात आले. या वेळी दोन युवकांनी मध्यस्थी केल्याने तरुणीचा जीव वाचला. त्यानंतर वार करणाऱ्या आरोपीला चोप देत पोलीस चौकीत नेण्यात आले.

**आरोपी अटकेत**

एकतर्फी प्रेमातून तरुणीवर हल्ला करण्यात आल्याची प्राथमिक माहिती असून शंतनू लक्ष्मण जाधव (वय २२, रा. मुळशी) असे आरोपी तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हल्ला झालेली तरुणी एका तरुणासोबत दुचाकीवरून मंगळवारी सकाळी ९ वाजून ५५ मिनिटांनी पुण्यातील सदाशिव पेठ भागात स्वाद हॉटेलच्या परिसरात आली होती. त्या ठिकाणी ते दोघे एकमेकांशी बोलत बोलत असताना आरोपी शंतनू जाधव तिथे आला आणि त्याने बॅगेतून कोयता काढत दुचाकीवर असणाऱ्या तरुण-तरुणीवर वार करण्यास सुरुवात केली. त्या वेळी दुचाकीवरील तरुण आपला जीव वाचवत तिथून पळून गेला. त्यानंतर शंतनू जाधव याने तरुणीचा पाठलाग करीत तिच्यावर हल्ला करण्यास सुरुवात केली.

दरम्यान, या परिसरात असलेल्या स्थानिक तरुणांनी वेळीच धाव घेत आरोपी शंतनू जाधव याच्या हातून कोयता हिसकावून घेत मुलीचा जीव वाचवला. त्यानंतर त्याला चोप देत पोलीस ठाण्यात नेऊन पोलिसांच्या ताब्यात दिले.

या घटनेत दोघेही तरुण तसेच तरुणी जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे. या घटनेबाबत विश्रामबाग पोलीस अधिक तपास करीत आहेत.


# मुसळधार पावसाने पोलादपूर-खेड रस्त्यावर दरड



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील पैठण ते पांगळोलीमार्गे ओंबळी रस्त्यावर मंगळवारी सकाळी दरड कोसळल्याची घटना झाली. या वेळी तत्परतेने दरड हटविण्यात यश मिळविल्याची माहिती तहसीलदार कपिल घोरपडे यांनी दिली.

पांगळोली ते ओंबळी हा रस्ता खेडपर्यंत जात असून कशेडी घाटाला पर्यायी वाहतूक सुरू असते. या मार्गावर मंगळवारी सकाळी दरडी कोसळल्याची माहिती आपत्ती निवारण कक्षाला प्राप्त झाल्यानंतर तातडीने सार्वजनिक बांधकाम उपविभागामार्फत जेसीबी पाठवून दुपारपर्यंत दरडी हटविण्यात यश आल्याची माहिती तहसीलदार कपिल घोरपडे यांनी दिली.



### सैनिकनगर येथील संरक्षक भिंत कोसळली

**शहरातील सैनिकनगर येथील रस्त्यालगतच्या गटारांचे बांधकाम सुरू असताना एका घराची संरक्षक भिंतच गटाराच्या चरामध्ये कोसळल्याची घटना मंगळवारी (दि. २७) दुपारी घडली. नगरपंचायतीमार्फत सैनिकनगर भागातील पालकर यांच्या घराभोवतालीच्या संरक्षक भिंतीलगतच्या गटारासाठी चर खणण्याचे काम सुरू केले, मात्र हे काम करताना संरक्षक भिंत खणलेल्या चरामध्ये कोसळली. सुदैवाने या चरामध्ये कोणीही कामगार नसल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही.**

पान १ वरून

### पाटण्यात भ्रष्टाचाऱ्यांची हातमिळवणी

आपल्याला आपल्या बूथमध्ये राजकीय कार्यकर्त्यापेक्षाही जास्त काम करीत समाजाची सुखदुःखं जाणून घेऊन स्वतःची ओळख निर्माण केली पाहिजे. अनेक गोष्टी असतात जिथे ग्राउंड लेव्हलचा फिड बॅक आवश्यक असतो. बूथवरचे कार्यकर्ते यामध्ये मोठा वाटा उचलत असतात. पंतप्रधान असो किंवा मुख्यमंत्री हे सफल नीती तयार करू शकत असतील, तर ती बूथ कार्यकर्त्यांच्या दिलेल्या माहितीच्या आधारावर असते, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

तुमच्या मनात काही करायची इच्छा असेल तर माध्यम नसते, पण जेव्हा तुम्ही जर माध्यम झालात तर नेतृत्व आपोआप तुमच्याकडे येईल. जुनी पुस्तके गोळा करा व गरीब कुटुंबांमध्ये वाटा. अंगणवाडीत जाऊन मुलांना खजूर खाऊ घाला. बोरांचा मोसम असेल, तर बोरे खाऊ घाला. चॉकलेट असतील तर द्या. जेव्हा जनतेशी संबंधित छोटी कामे कराल तेव्हा कुणीही तुम्हाला दूर ढकलणार नाही. सगळे तुमचा शब्द मानतील, कारण तुमची ओळख एखाद्या समाजसेवकासारखी झाली असेल हे विसरू नका. गावा-गावांमध्ये, शहरांमध्ये जाऊन तुम्हाला अशा प्रकारे काम करावे लागेल तेव्हा बूथ मजबूत होईल, असे आवाहन पंतप्रधान मोदींनी कार्यकर्त्यांना केले.

### पनवेल मनपा क्षेत्रातील मुस्लीम, ख्रिश्चन, बोहरी समाजाच्या दफनभूमीचा प्रश्न मार्गी

या बैठकीत कळंबोली सेक्टर १२, प्लॉट नंबर सी २ए येथे असलेला ४२ गुंठ्यांचा भूखंड मुस्लीम आणि ख्रिश्चन समाजाला दफनभूमीसाठी विभागून देण्याचे ठरले. बोहरी समाजाला खारघर सेक्टर १४, प्लॉट नंबर १५ हा भूखंड दफनभूमीसाठी देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पनवेल मधील एक भूखंड बोहरी समाजाला दफनभूमीसाठी देण्याचे ठरले. याबद्दल तिन्ही समाजाच्या पदाधिकारी व बांधवांनी आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांचे आभार मानले आहेत.

***ख्रिश्चन समाजासाठी दफनभूमीची आवश्यकता होती. त्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख यांची भेट घेतली होती. त्यांनी तत्काळ यात लक्ष देण्याचे मान्य केले. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी कळंबोलीत प्रत्यक्ष भेटही दिली होती. त्या वेळी सकारात्मक प्रतिसाद मिळाला. त्यानुसार दफनभूमीचा प्रश्न मार्गी लागणार आहे. त्याबद्दल आभार मानतो.***

***-फादर शाजी जोसेफ सेक्रेटरी, रायगड ख्रिश्चन असोसिएशन***

### गव्हाण विभागातील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

कमलाकर देशमुख, सुहास भगत, कमलाकर घरत, सुधीर ठाकूर, व्ही. के. ठाकूर, पी. के. ठाकूर, टी. के. ठाकूर, जी. के. ठाकूर, विजय शहाबाजकर, विजय ठाकूर, निलेश ठाकूर, भास्कर पाटील, लक्ष्मण ठाकूर, प्रल्हाद ठाकूर, मधुकर ठाकूर, दयानंद घरत, राजेंद्र देशमुख, राजेश पाटील, आशिष घरत, सी. सी. भोईर, सी. एल. ठाकूर, श्रीधरशेठ भगत, अजय भगत, रमेश भगत, प्रल्हाद भगत, रतनशेठ भगत, अमृत भगत, प्रभाकर भगत, जीवन भगत, सदाशिव भगत, महेंद्र भगत, योगेश भगत, श्रीधर मोकल, तुषार भोईर, चंद्रकांत पाटील, दर्शन ठाकूर, लक्ष्मण काका, शंभो ठाकूर, विजय कडू, मदन ठाकूर, सदाशिव ठाकूर, जगदीश ठाकूर, प्रकाश कडू, राज कोळी, अनिल कोळी, अशोक पाटील, विक्रम भगत, अनिल थोरवे, रूपेश घरत, विनोद पाटील, परशुराम कोळी, गणेश पाटील, अशोक घरत, दत्ता गुरुजी, संतोष म्हात्रे, संतोष पाटील, महेश पाटील, आतिश पाटील, चंद्रकांत घरत, सुजाता पाटील, नंदा भोईर, आनंदी घरत, जयश्री घरत, आशा ठाकूर, नंदा ठाकूर, आशा म्हात्रे, इंदूमती पाटील, कविता म्हात्रे, करिश्मा म्हात्रे, सुवर्णा कडू, काजल घरत, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचे उपमुख्याध्यापक व प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते, प्रा. बाबुलाल पाटोळे, उपशिक्षक सागर रंधवे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# महाडमध्ये पुन्हा १८ जनावरांची सुटका; तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

कत्तलीसाठी चोरून आणलेल्या १८ जनावरांची सुटका महाड शहर पोलीस ठाण्याच्या धडक कारवाईने झाली आहे. या प्रकरणी राजेवाडी येथील तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाड शहर पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राजेवाडी गावामध्ये ही कारवाई झाली असून गावातील गणी इब्राहिम कारवीनकर (वय ४५), मुन्नफ गणी कारविणकर, मोहम्मद इब्राहिम करबेलकर या तिघांनी कत्तलीसाठी जनावरे चोरून आणल्याची माहिती महाड शहर पोलिसांना मिळताच सोमवारी रात्री २ वाजण्याच्या सुमारास राजेवाडी गावात पोलिसांनी धाडसी कारवाई करीत महम्मद करबेलकर यांच्याकडे आणि गणी इब्राहिम करवीनकर, मुन्नफ गणी कारविणकर यांच्याकडे एकूण १८ जनावरे आढळली.

कत्तलीसाठी घेऊन जाणाऱ्या या जनावरांची सुटका महाड शहर पोलिसांनी केली आहे, तसेच या तिघांना अटक केली आहे.

याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून १८ जनावरे व कत्तलीसाठीचे शस्त्र असा एकूण अंदाजे १४ लाख ३९ हरुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

जनावरांमध्ये १५ जनावरे बैल तर तीन लहान वासरे आहेत. सर्व जनावरांना चिपळूणजवळील गोशाळेत पाठविण्यात आले असून या घटनेचा अधिक तपास महाड शहर पोलीस ठाण्यामार्फत सुरू आहे.

# आवास हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जागतिक आमली पदार्थविरोधी दिनानिमित्त बा. ना. हायस्कूल आवास येथे सोमवारी (दि. २६) मांडवा पोलीस निरिक्षक राजीव पाटील यांच्याकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी कोणत्याही अमली पदार्थांचे सेवन करू नये आणि असे कोणी करत असेल तर ते त्वरित मोठ्या माणसांच्या निदर्शनास आणून द्यावे, अन्यथा पोलिसांशी संपर्क साधावा. १४ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांना योग्य काय आणि अयोग्य काय याची समज नसते. जीवनातील हा टप्पा अतिशय महत्त्वाचा असतो. विद्यार्थ्यांनी फेसबुक इंस्टाग्राम ट्विटर यांसारख्या सोशल मीडियाचा जास्त वापर करणे टाळावे असे ते म्हणाले. मांडवा पोलीस निरीक्षक राजीव पाटील यांचे सरपंच अभिजित राणे व मुख्याध्यापक प्रमोद भगत यांनी आभार व्यक्त केले.

# नेरळ-माथेरान घाटात मोठे दगड रस्त्यावर

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ-माथेरान घाटात सलग तीन दिवस सुरू असलेल्या पावसामुळे मंगळवारी (दि. २७) सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास दगड खाली रस्त्यावर आले. सुदैवाने या वेळी रहदारी कमी असल्याने अपघात टळला. पावसाळी पर्यटन सुरू झाले असून पर्यटकांनी आपली वाहने हळू चालवावीत असे आवाहन माथेरान आणि नेरळ पोलीस ठाण्याकडून करण्यात आले आहे.

नेरळ-माथेरान या सात किमीच्या घाटात वेडीवाकडी वळणे आहेत. माथेरानमध्ये गेले तीन दिवस सतत पाऊस सुरू आहे. त्यामुळे घाटरस्त्यात मंगळवारी सायंकाळी त्या भागात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पाण्यासोबत घरंगळत खाली आले. सायंकाळी पर्यटक परतीच्या मार्गावर असतात आणि त्यामुळे हे दगड पर्यटकांच्या वाहनांवर कोसळून अपघात होण्याची शकयता होती. चारचाकी वाहनाला धडक देऊ शकेल एवढे दगड रस्त्यावर आले, मात्र त्या वेळी सुदैवाने कोणतेही वाहने घाटरस्त्याने वाहतूक करीत नव्हते. त्यामुळे मोठा अपघात टळला आहे.

याबाबत नेरळ-माथेरान टॅक्सी संघटनेच्या चालकांनी आणि पोलीस कर्मचारी सुरेश पाटील, प्रमोद पाटील यांनी रस्त्यावर आलेले दगड बाजूला काढून घाटरस्ता मोकळा केल्याने वाहतुकीस अडथळे राहिले नाहीत.



नेरळ-माथेरान घाटरस्त्याचे हद्दीमधील पोलीस ठाणे असलेल्या नेरळ पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर आणि माथेरान पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शेखर लव्हे यांनी पर्यटकांनी आपली वाहने हळू चालवावीत, अशी सूचना केली आहे.

# कर्जत येथील एआय विद्यापीठात १ ऑगस्टपासून पहिले शैक्षणिक वर्ष

**मुंबई : प्रतिनिधी**

देशातील पहिले एआय म्हणजचे आर्टिफिशल इंटेलिजेंस विद्यापीठ महाराष्ट्रात रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे सुरू होत आहे. या प्रगत तंत्रज्ञानामुळे जग बदलेल असे म्हटले जाते. त्यामुळे एआय किंवा संबंधित क्षेत्रांवर प्रभुत्व मिळवल्यास मोठ्या आणि फायदेशीर रोजगाराच्या संधी मिळू शकतात. युनिव्हर्सल एआय युनिव्हर्सिटी या विद्यापीठामध्ये १ ऑगस्टपासून पहिले शैक्षणिक वर्ष सुरू होणार आहे.

कर्जत येथे स्थापन करण्यात आलेल्या देशातील पहिले एआय विद्यापीठ हे ग्रीन कॅम्पस असेल आणि त्याला महाराष्ट्र सरकारच्या उच्च तांत्रिक आणि शिक्षण विभागाने मान्यता दिली आहे. हे विद्यापीठ तंत्रज्ञानाच्या शिक्षणात महत्त्वाची भूमिका बजावेल असे म्हटले जात आहे. येथे एआय आणि भविष्यातील तंत्रज्ञानातील विशेष पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे.

या अभ्यासक्रमांतर्गत येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना एआय तंत्रज्ञानाबद्दल संपूर्ण माहिती आणि शिक्षण दिले जाईल. यामध्ये व्हर्च्युअल रिलिटी आणि सुपर कॉम्प्युटरचा समावेश असेल.

या विद्यापीठात तंत्रज्ञानाच्या अभ्यासासाठी हायटेक क्लास रूम्स, सुपर कॉम्प्युटर आणि व्हर्च्युअल रिलिटी उपकरणे अशी वेगवेगळी तयारीही करण्यात आली आहे.

# आषाढीला मांसविक्री दुकाने बंद ठेवण्याची मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल-रुक्मिणीची आषाढी एकादशी गुरुवारी (दि. २९) साजरी केली जाते. या दिवशी तमाम हिंदू जनता व्रत संकल्प करते. म्हणून या दिवशी मांस, मच्छीविक्री करणारी दुकाने बंद ठेवण्याची मागणी रायगड जिल्हा मराठा क्रांती मोर्चाकडून करण्यात आले आहे.

आषाढी एकादशीचा मानसन्मान राखला पाहिजे, असे रायगड जिल्हा मराठा क्रांती मोर्चाकडून कराडे खुर्द ग्रामपंचायतीला निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात मांसाहार होऊ नये, अशी मागणी केली आहे.



**खोपोली : भाजपतर्फे राष्ट्रीय पातळीवर बूथ प्रमुखांचे संमेलन भोपाळ येथे झाले. या संमेलनात पंतप्रधान मोदी यांचे भाषण ऐकण्यासाठी महिला जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या निवासस्थानी व्यवस्था करण्यात आली होती. या वेळी वरिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे विविध ठिकाणी वह्यांचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने भाजपचे खारघर तळोजा मंडळ उपाध्यक्ष शुभ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वह्यांचे वाटप भाजपचे तालुकाध्यक्ष तथा मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २७) करण्यात आले.

भाजप युवा मोर्चाचे खारघर तळोजा मंडळ उपाध्यक्ष शुभ पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम राबवून साजरा झाला. वाढदिवसानिमित्त सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य क्षेत्रात गेली तीन दशके उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे खारघर येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच शुभ पाटील यांच्या वतीने दप्तरांचेही वाटप करण्यात आले.

या वेळी तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यानंतर वह्यांचे वाटप केले तसेच शुभ पाटील यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती प्रवीण पाटील, सोमनाथ पाटील, सचिन पाटील, पप्पू खामकर, विनोद खानावकर, वैभव पाटील, विनय राठोड, यश म्हात्रे, राकेश चौधरी, वाघमारे सर यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक उपक्रमांद्वारे नेहमीच मदतीचा हात देण्यात येतो. त्याअंतर्गत पनवेल महापालिकेच्या लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयात मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्यांचे पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

या वेळी भाजपचे पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, प्रभाग क्रमांक १९ अध्यक्ष पवन सोनी, माजी नगरसेवक जगदीश गायकर, कविता पाटील, सपना पाटील, मुख्याध्यापीका अनुपमा डामरे, सरिता काकडे, वैशाली पाटील, वैशाली सोनावणे, चंद्रकांत वारगुडे, निलम देवळे, अर्चना माने, जयश्री रोडे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.







**उरण : रामप्रहर वृत्त**

चिरले येथे रायगड जिल्हा परिषद शाळेमध्ये हुतात्मा नामदेव शंकर घरत सामाजिक व शैक्षणिक विकास मंडल व आई एकविरा माऊली महिला मंडळ, चिरले यांच्या वतीने सर्व विद्यार्थीना मोफत वहया वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक व मान्यवरांचे स्वागत दिलीप पाटील यांनी केले. या वेळी भाजपा महिला मोर्चा उरण तालुका सरचिटणीस वर्षा प्रेमकुमार घरत यांनी शैक्षणिक वर्षात विद्यार्थांना आवश्यक असलेल्या सर्व शैक्षणिक साहित्य पुरविण्याचे अभिवचन दिले. या नंतर त्यांनी चिरले ग्रामपंचायत हद्दीमधील चिरले, गावठान, जांभुळपाडा या शालेतील विद्याथ्याना चालू शैक्षणिक वर्षात कोणत्याही शैक्षणिक साहित्याची गरज भासल्यास त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

कामगार नेते जितेंद्र घरत यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आम्ही सारी मंडळी ही रामशेठ ठाकूर यांच्या तालमीत काम करणारे सर्व कार्यकर्ते दरवर्षी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळातर्फे हाजारो विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम केला जातो त्याचा एक छोटा भाग मानून हा कार्यक्रम आयोजित केला आहे. शाळेचे नावलौकीक केले पाहिजे. भविष्यात काहीही मदत लागल्यास आम्ही सर्व मान्यवर आपल्या सोबत आहोत, अशी ग्वाही दिली.

या कार्यक्रमाला चिरलेचे उपसरपंच राजन घरत, भाजप चिरले अध्यक्ष मधुकर मढवी, केंद्र प्रमुख श्री. म्हात्रे, मुख्याध्यापक अनिल म्हात्रे, मोतीराम मढवी, सुभाष घरत, विकास माळी, अक्षय ठाकूर, भाजप जि. प. जासई अध्यक्ष शमीता ठाकूर, सोनल घरत, संध्या मढवी, आरती मढवी, सविता ठाकूर, शिक्षक वर्ग दिलीप पाटील दीपक पाटील, ताई म्हात्रे, माली मॅडम आदी उपस्थित होते.

# गव्हाण विद्यालयातील गुणवंतांचा पत्रकार समितीकडून सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार उलवे येथील उत्कर्ष पत्रकार समितीच्या वतीने करण्यात आला.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभात इयत्ता दहावी व बारावीमधील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, गुलाब पुष्प, लेखणी व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

दहावीमधील जान्हवी घरत, श्वेता घाडगे, दीपक बचाटे तर बारावी परीक्षेमधील रीया नाईक, वेद पाटील, वर्षाली पाटील तसेच इयत्ता दहावीमधील ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त झालेल्या पुढील विद्यार्थ्यांचाही यात आरती शेजुळ, अन्वय गुळवे, रोहीत गुळवे, प्रथमेश कोरेकर, दीपिका माने, तृषा कोळी, क्षितिजा कांबळे, साक्षी कणसे, अथर्व गावंड, सलोनी आंबेरकर, मनस्वी कोळी, गौरी वायळ, जिया कोळी आदींचा गुणगौरव करण्यात आला.

शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेचा आलेख उंचावण्याचे आवाहन केले. उत्कर्ष पत्रकार समितीचे अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाला गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, गव्हाण ग्रामपंचायतच्या सदस्या योगिता भगत, कामिनी कोळी, उषा देशमुख, सुनिता घरत यांच्यासह पत्रकार महिला संघाच्या अध्यक्षा डॉ. स्वाती पाटील व अन्य पदाधिकारी, विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते, 'रयत'चे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे आदी उपस्थित होते. विद्यालयाचे उपशिक्षक सागर रंधवे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.



# अमली पदार्थांचे वाढते सेवन

## तळोजा पोलिसांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**पनवेल : वार्ताहर**

जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त औचित्य साधून इलाईट पब्लिक स्कूल, तळोजा आणि परशुराम जोमा म्हात्रे महाविद्यालय, नावडे या ठिकाणी तळोजा पोलिसांनी तरुणांमध्ये वाढणाऱ्या अमली पदार्थाच्या सेवनामुळे होणाऱ्या परिणामाबाबत माहिती दिली.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत अंतर्गत तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश काळदाते यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गुरव यांनी तळोजा फेज वन येथील इलाईट पब्लिक स्कूल आणि नावडे येथील परशुराम जोमा म्हात्रे महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

तरुणांमध्ये वाढणाऱ्या अमली पदार्थाच्या सेवनामुळे होणाऱ्या परिणामाबाबत माहिती देत विद्यार्थ्यांना व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. या वेळी शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## गुरूपौर्णिमेनिमित्त सामाजिक कार्यक्रम

**पनवेल : वार्ताहर**

प.पू. सद्गुरु श्री साई नारायण बाबा यांच्या आध्यात्मिक उपस्थितीत श्रीगुरु पौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने ३ जुलै रोजी धार्मिक कार्यक्रमांसह गरीब मुलांना मोफत दूध आणि अन्न वाटप करण्यात येणार आहे.



पनवेलमधील श्री साई नारायण बाबा आश्रम येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही श्रीगुरु पौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने यानिमित्त सकाळी ८ वाजता श्री व्यास पूजन व महायज्ञ, गरीब मुलांना मोफत दूध आणि अन्न वाटप, तसेच आपल्या परम गुरुजींच्या पावन चरण पादुकेचा महाअभिषेक करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सकाळी ९ वाजता वेदमंत्र साधना, सकाळी १०.३० वाजता यज्ञोपवीत धरणं, श्री महामंत्रोपदेश, श्रीगुरु पौर्णिमेच्या महत्वावर प्रवचन, महा श्री चरण पूजा असे धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहे. तसेच भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

याविषयी अधिक माहितीसाठी श्री नारायण बाबा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष खेमचंद गोपलाणी (९८१९०७०२७७), सेक्रेटरी रामलाल चौधरी (९८६९०५२९८१), राम थडानी (९८२०६१६३९०) यांच्याशी संपर्क साधावा. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री भगवती साई संस्थानच्या श्री साई नारायण बाबा आश्रमतर्फे करण्यात आले आहे.

## भोकरपाडा येथे महिला शेतकरी सन्मान दिन



पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल तालुक्यातील भोकरपाडा येथे कृषी संजीवनी सप्ताह अंतर्गत महिला शेतकरी सन्मान दिन साजरा करण्यात आला. या वेळी तालुका कृषी अधिकारी शरद गिते यांनी उपस्थित शेतकरी व महिलांना कृषी विभागाच्या योजना तसेच थेट शेतमाल विक्री, कृषी मेळावा संदर्भात मार्गदर्शन केले. पनवेलचे मंडळ कृषी अधिकारी श्री. हेगडे यांनी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया, महिला साक्षमिकारण, महिलांचा कृषी व इतर क्षेत्रात असणारा सहभाग याबाबत सखोल मार्गदर्शन केले. तसेच कृषी पर्यवेक्षक आर. डी. चौगुले यांनी उपस्थितांना पौष्टिक तृणधन्याचे आहारातील महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. कृषी पर्यवेक्षक श्री. सुरवसे यांनी पीएम किसान बाबत मार्गदर्शन केले.

या वेळी गोविंद दत्तात्रय पाटील पोलीस पाटील व प्रगतशील शेतकरी प्रकाश आगिवले तसेच महिला शेतकरी बहुसंख्येने हजर होत्या. कार्यक्रमाचे नियोजन सूत्रसंचालन व आभार संगीता पाटील, कृषी सहाय्यक यांनी केले. या वेळी तानाजी दोलतोडे, कृषी अधिकारी, श्रीम. डाके, कृषी सहाय्यक मनीषा वळसे, नमिता वाकळे उपस्थित होत्या.



**पनवेल : न्हावे ग्रामपंचायतीकडून तेथील विद्यालयास इन्व्हर्टरसाठी ५३,८०० रुपयांचा धनादेश भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे यांनी विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत भोईर यांच्याकडे हस्ते सुपूर्द केला. या वेळी तुषार भोईर, चंद्रकांत पाटील, विनोद पाटील, रूपेश घरत, दर्शन ठाकूर, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा 'रयत'चे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी आदी उपस्थित होते.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथे रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय मंगळवारी (दि. २६) स्टाफ वेल्फेअर समितीच्या वतीने आरक्षणाचे प्रणेते, समतावादी, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी यावेळी छत्रपती शाहू राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली अर्पण केली तसेच छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्याविषयी विचार मांडले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी, प्रा. महेश्वरी झिरपे (समन्वयक अंतर्गत गुणवत्ता कक्ष) या सर्वांनी उपस्थित राहून छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली अर्पण केली.

या कार्यक्रमाचे आयोजन प्राध्यापक प्रतीक्षा पाटील (समन्वयक स्टाफ वेल्फेअर समिती) तसेच प्रा. प्रथमेश उदेकर व प्रा. डॉ. नीलम लोहकरे यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राहुल कांबळे यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रा. डॉ. धनवी आवटे यांनी मानले.



## सावरसईत शैक्षणिक साहित्याचे वाटप



**पनवेल : वार्ताहर**

विशाल मनोहर सावंत मित्र परिवार यांच्या वतीने सावरसई येथील २०० विद्यार्थ्यांना वहया तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला विशाल मनोहर सावंत, उमरोली ग्रामपंचायत सदस्य शुभांगी मढवी, संदीप पाटील, नितीन शिंदे, आकाश घाटे, नरेश मढवी, धिरज कदम आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रिया फाऊंडेशनचे संदीप म्हात्रे, जितेंद्र पाटील, सागर कांबळे, जयेश मोरे, किरण पाटील, समीर मते, दिनेश चिंबोरे, दिलीप चिंबोरे, प्रणय दळवी आदींनी मेहनत घेतली.

## सह्याद्री सामाजिक विकास संस्थेतर्फे वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सह्याद्री सामाजिक विकास संस्था नवीन पनवेल ह्या संस्थेने छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त सोमवारी (दि. २६) रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सांगुर्ली व रायगड जिल्हा परिषद शाळा, चिंचवणमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले.

या वेळी शाळेतील शिक्षक वर्ग, संस्थेची कार्यकारिणी बन्सी ढवळे, संतोष पारसे, प्रवीण मगदुम, अॅड. प्रमिला भाईगडे, लता केसरकर, सारिका गावडे, विद्या घन:श्याम घोरपडे, शशिकांत कुंभार, संपदा प्रताप पाटील, अमृता आनंदा यादव, दादाभाऊ कासुटे. तसेच हिंतचिंतक गणेश मुंडले, अॅड. प्रताप पाटील, प्रिती राजाराम मगदुम, मनोहर गावडे, रामचंद्र केसरकर आदी उपस्थित होते.

सह्याद्री सामाजिक विकास संस्था अॅड. मनोज भुजबळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सतत विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवत असते. पुरग्रस्तांना मदत, वैद्यकीय मदत, शैक्षणिक साहित्य वाटप, वृध्दाश्रमासाठी मदत, महिलांसाठी हळदीकुंकू कार्यकम, अशा विविध उपक्रमामध्ये नेहमी कार्यरत असत.



## संपादकीय

# प्रगल्भतेसाठी प्रयत्न हवेत

एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश मिळवून उत्तम कारकीर्दीच्या उंबरठ्यावर असलेल्या दर्शना पवारची हत्या महाराष्ट्राला हादरवून गेली असतानाच मंगळवारी पुण्यात आणखी एका तरुणीवर संतप्त तरुणाने कोयत्याने हल्ला करण्याची घटना धक्कादायकच आहे, परंतु या वैयक्तिक स्वरुपाच्या घटनांचे विरोधकांनी राजकारण न करता, त्यामागील सामाजिक-मानसिक कारणांची गंभीर चर्चा यानिमित्ताने होण्याची गरज आहे.

**एमपीएससीची परीक्षा उत्तमरीत्या उत्तीर्ण होऊन, इच्छित कारकीर्दीच्या उंबरठ्यावर असलेल्या दर्शना पवार या तरुणीच्या हत्येचे प्रकरण ताजे असतानाच, अवघ्या आठवड्या-दोन आठवड्यात प्रेमप्रकरणातील नकारावरून अन्य एका तरुणीवर एका तरुणाने भर रस्त्यात कोयत्याने हल्ला केल्याची घटना मंगळवारी पुण्यातील सदाशिव पेठेत घडली. त्या परिसरात असलेल्या एमपीएससीच्याच अन्य काही तरुणांनी या १९ वर्षांच्या तरुणीला वाचवले आणि संबंधित तरुणाला पोलिसांच्या ताब्यात दिले. हल्ल्याची संपूर्ण घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली असून यात शंतनु जाधव हा हल्लेखोर तरुण आपल्या सॅकमधून आधीपासूनच कोयता घेऊन आल्याचे स्पष्ट दिसते. त्यामुळे हा हल्ला रागाच्या भरात झालेला नसून हल्ला करण्याचे ठरवूनच तो तरुण तिथे पोहचला होता हे स्पष्ट दिसते. एकतर्फी प्रेमातून या तरुणाने आपल्यावर हल्ला केल्याचे जखमी तरुणीने म्हटले आहे. या दोन धक्कादायक घटनांमुळे विरोधकांनी त्या विषयावर राजकारण सुरू केले असून राज्यातील कायदा व सुव्यवस्था परिस्थितीविषयी प्रश्न उपस्थित केले आहेत, परंतु या दोन्ही प्रकरणांतील तपशील पाहता ही प्रकरणे नकार न पचवू शकणारी पुरुषी मानसिकताच समोर आणतात. दोन्ही प्रकरणांतील हल्लेखोर तरुण हे नोकरीच्या व त्यासाठीच्या परीक्षेच्या तणावाचा सामना करणारे आहेत. अशा मुळातच तणावपूर्ण कालखंडातून जात असताना भावनिक ताण व निराशा सोसण्याची क्षमता गमावून बसण्यातून हे हल्ले झाले असावेत असा सूर एमपीएससीची तयारी करणाऱ्या अनेक तरुणांनी समाजमाध्यमांवर लावला असून त्यात प्रथमदर्शनी तरी तथ्य वाटते. याआधीच्या दर्शना पवार हत्या प्रकरणाची गेला आठवडाभर बरीच चर्चा सुरू होती. एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर दर्शनाने लग्नास नकार दिल्याने संतप्त झालेल्या राहुल हंडोरे याने कट रचून दर्शनाची हत्या केल्याचा संशय पुणे ग्रामीण पोलिसांनी व्यक्त केला आहे. राहुल आणि दर्शना यांचा जुना परिचय होता आणि राहुलने दर्शनाला एमपीएससीच्या परीक्षेची तयारी करण्यात मदत केली होती असे म्हटले गेले आहे, परंतु परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर क्लास वन अधिकारी बनणारी दर्शना आता आपल्याशी लग्न करणार नाही हे ध्यानात आल्याने चिडलेल्या राहुलने पुण्यातून धारदार कटर ब्लेड खरेदी करून दर्शनाला ट्रेकिंगच्या बहाण्याने राजगडावर नेले आणि तेथे लग्नाच्या विषयावरून बाचाबाची झाल्यानंतर तिची अत्यंत थंड डोक्याने हत्या केली. अवघ्या काही दिवसांच्या अंतराने घडलेली महाराष्ट्रातील ही दोन प्रकरणे अनेक प्रश्न उपस्थित करतात. या प्रकरणांचे राजकारण न करता त्यामागील सामाजिक कारणांची गांभीर्याने चर्चा होण्याची गरज आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या व्यक्ती जेव्हा जेव्हा हत्येसारख्या गुन्ह्याकडे वळतात तेव्हा तेव्हा गुन्हेगाराच्या मानसिकतेविषयी प्रश्न उपस्थित केले जातात. या दोन्ही प्रकरणांतील तरुण हे प्रेमप्रकरणातील नकार पचवू शकलेले नाहीत. महाविद्यालयांमध्ये एकत्र येणाऱ्या तरुणतरुणींची जवळीक प्रगल्भ व्हावी यादृष्टीने सामाजिक-कौटुंबिक पातळीवर काय प्रयत्न व्हायला हवेत याची चर्चा या निमित्ताने झाल्यास अशा दुर्दैवी घटना टाळता येतील.**

# आला पावसाळा, तब्येत सांभाळा!




पावसाळा हा ऋतु बालकापासुन वृद्धांपर्यंत सर्वांना हवाहवासा वाटतो. या काळात स्वच्छता आणि आरोग्याची निगा राखणे महत्त्वाचे असते. पावसाळ्यात विविध संसर्गजन्य आजारांपासुन रक्षण करण्यासाठी आणि निरोगी राहुन पावसाचा आनंद घेण्यासाठी कोणती काळजी घ्यावी याविषयी माहिती उदरविकार तज्ज्ञ डॉ. पंकज इंगळे यांनी दिली आहे.

पावसाळ्यात होणाऱ्या आजारांच्या लक्षणांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. अन्यथा आजार वाढून त्याचा आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे आजार वा संसर्ग अंगावर काढू नका. डॉक्टरी सल्ल्यांशिवाय केलेले घरगुती उपचार जीवावर बेतू शकतात त्यामुळे तातडीने डॉक्टरांची मदत घ्या. पावसाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर दूषित पाण्याची समस्या उद्भवते आणि त्यामुळेच अतिसारासारख्या रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होतो. अतिसाराच्या लक्षणांमध्ये पुढील बाबींचा समावेश असतो. नॉशिया, उलट्या होणं आणि वारंवार शौचाला पातळ होणं. उपाय अतिसारावर करावयाचा घरगुती उपाय म्हणजे ओआरएस पॅक देणं किंवा मीठ, साखर घालून पाणी देणं. रुग्णाच्या जेवणात मोठ्या प्रमाणावर टोस्ट, सफरचंद, केळ, शिजलेला भात, लॅक्टोबॅसिलस युक्त दही यांचा समावेश असावा. जर दोन दिवसात काही सुधारणा झाली नाही तर तत्काळ डॉक्टरांशी संपर्क साधावा.

पावसाळ्यातील अजून एक आजार. व्हिब्रिओ जीवाणूपासून कॉलराची लागण होते. दूषित अन्न व पाणी प्यायल्याने हा आजार होऊ शकतो. अचानक डिहायड्रेशन होऊन जुलाबावाटे शरीरातील पाणी कमी होऊन अशक्तपणा येणे हे याचे प्राथमिक लक्षण. तसेच पिण्याच्या पाण्यात उंदीर पडून मेल्याने किंवा पडल्याने पाणी दूषित होऊन हा आजार पसरतो. साथीचा तापः साथीचा आजार हा सर्वसाधारण वर्षभर कधीही होऊ शकतो, परंतु पावसाळ्यात अधिक प्रमाणात दिसून येतो. तीन ते सात दिवस सर्दी, खोकला, ताप असेल तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे योग्य ठरेल.

उंदराच्या मूत्रविसर्जनातून हा जीवाणू गढूळ पाण्यात शिरतो. या पाण्यातून चालताना पायाला झालेल्या जखमा व छोट्या चिरांमधून जंतुसंसर्ग होतो. ताप येणं, डोळे लाल होणं, यकृतदाह, कावीळ व मूत्रपिंडाच्या कामात बाधा येणं ही त्याची लक्षणं. प्रत्येक वेळी मुलांना घराबाहेर पाठवताना गमबूट घालणं शक्य नाही. त्यामुळे गढूळ पाण्यात मुलांना खेळू न देणं तसंच घरी आल्यावर पाय स्वच्छ धुणं आणि पायांवरील छोट्या-मोठ्या जखमांवर त्वरित औषधोपचार करणं हा लेप्टोच्या प्रतिबंधाचा सोपा उपाय आहे.

उलटी, जुलाब आणि पोटदुखी हे सर्वसाधारण पोटाच्या संसर्गाची लक्षणे व या वातावरणात पोटदुखीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. अस्वच्छ अन्नपदार्थ किंवा द्रवपदार्थांचे सेवन केल्याने पोटाचा संसर्ग होण्याची शक्यता दिसून येते. म्हणून शक्यतोवर पाणी उकळून प्यावे, तसेच घरतील अन्नपदार्थ खाणे व जास्तीत जास्त पाणी पिणे आरोग्यास चांगले.

अशुध्द पाणी व अन्न यामुळे पावसाळ्यात कावीळ हा आजार हमखास होऊ शकतो. थकवा, लघवीचा व डोळ्यांचा रंग पिवळसर होणे, उलटी, यकृतामध्ये बिघाड आदी लक्षणे दिसून आल्यास कावीळीची शक्यता व्यक्त केली जाते. डोळे लालसर होणे हे ही एक महत्त्वाचे लक्षण म्हणून पाहिले जाते. कावीळ मुख्यत्वे विषाणू ए आणि ई मुळे होते. लहान मुले व गरोदर महिलांमध्ये कावीळ आजाराबाबत विशेष काळजी घेणे आवश्यक असून दीर्घकालीन कावीळीबाबत अतिदक्षता आवश्यक आहे. तसेच पायांना सूज आल्यासही दुर्लक्ष करू नये.

पोटात दुखणं, थंडी वाजणं आणि घाम येणं, अतिसार, नॉशिया आणि उलट्या, ताप चढणं, स्नायू दुखणं आणि चक्कर येणं. मलेरिया होऊ नये याकरता कोणती काळजी घ्यावी. लांब हाताचे कपडे घाला, डासांना प्रतिबंध करण्यासाठी मच्छरदाणी तसंच औषधांचा उपयोग करा. पाणी साठून राहाणार नाही याची काळजी घ्या. जर दोन दिवसांपासून एखाद्या व्यक्तीला बराच ताप चढत असेल तर रुग्णाला डॉक्टरांकडे नेणे आवश्यक आहे.

अचानकपणे खूप ताप येणं, तीव्र डोकेदुखी, डोळ्यामागे दुखणं, सांधे आणि स्नायू खूप दुखणे, नॉशिया, उलट्या, त्वचेवर ॲलर्जी उठणं, ताप आल्यानंतर तीन ते चार दिवसांनी ती दिसून येतात. मलेरियामध्ये दर एक दिवसाआड थंडी भरून ताप येतो. पण लहान मुलांमध्ये उलट्या, जुलाब, रोज एकदा किंवा दोनदा ताप येणं अशा लक्षणांमुळे निदानात संदिग्धता निर्माण होते. डेंग्यूचा विषाणू एडिस नावाच्या डासामार्फत होतो. तीव्र ताप, हात- पाय मोडून येणं आणि अंगावर विशिष्ट प्रकारचे पुरळ येणं ही या आजाराची लक्षणं. विषाणूंमुळे होत असल्याने हा आजारही स्वनियंत्रित असतो, मात्र अनेकदा गुंतागुंत होण्याची शक्यता ताप उतरताना असते. म्हणून डॉक्टरमंडळी एकापेक्षा अधिक वेळा रक्तचाचणीचा सल्ला देतात. या दोन्ही आजारांवर प्रतिबंधक लस नाही. साठलेल्या स्वच्छ पाण्यात डासांची वाढ होत असल्याने पाणी साठू न देणं हा चांगला उपाय. याशिवाय कीटकनाशक औषधांची फवारणी आणि वैयक्तिक सुरक्षेसाठी मॉस्किटो रिपेलन्ट क्रीम, मच्छरदाणी असे उपाय करावेत. मुलांना पूर्ण बाह्यांचे कपडे घालावेत.

**(साभार : इंटरनेट)**

# रोगप्रतिकारक शक्ती 'अशी' वाढवा...

पाऊस अद्याप पुर्णतः कार्यरत झालेला नाही. पण याच पावसाळ्याच्या दरम्यान आला पावसाळा तब्येत सांभाळा, असे म्हटले जाते. आम्ही देखील तुम्हाला पावसाळ्यात आरोग्याची काळजी घ्या. असाच काहीसा सल्ला देत आहोत. अनेक आजारांना पावसाळ्यादरम्यानच पेव फुटते आणि त्यामुळे आपल्याला डॉक्टर गाठावा लागतो. पण जर आपला आहार परिपूर्ण असेल तर आपली रोगप्रतिकारक क्षमता वाढते.

आहारात रोज फळे असावीत. पावसाळ्यात मिळणारी फळे शक्यतो खावीत. जेवणात जास्तीत जास्त हळदीचा वापर करा. त्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते. पावसाळ्यात गरम पाणी पिणे गरजेचे असते. लघू आणि गरम म्हणजेच उष्ण गुणाचा आहार या दिवसात घ्यावा. आपल्या आहारातील विविध अन्नपदार्थ तयार करण्यासाठी आपण जे धान्य वापरतो ते जुने असावे. शक्यतो एक वर्षापेक्षा अधिक जुने असू नये. नवीन धान्य वापरायचे असेल तर ते धान्य भाजून घेतल्यास अधिक चांगले असते.

पावसाळ्यादरम्यान ज्वारीची भाकरी, कमी तेलाच्या पोळ्या, गरम दुध, शक्यतो मूगाचे वरण, भात अशी आहाराची मांडणी असावी. दह्याऐवजी त्यात थोडे पाणी घालून, घुसळून ताक करून घ्यावे. दही ताजे असावे. आंबट, शिळे असू नये. पावसाळ्याच्या सुरूवातीस आहाराचे प्रमाणही अधिक असू नये.

या ऋतूमध्ये मुरे, जिरे, हिंग, सुंथ, लिंबू, लसूण कांदा, आले कडिलिंब यांचा नेहमीपेक्षा थोडा अधिकच वापर स्वयंपाकामध्ये करावा. तेल, तूपाचा लोण्याचा वापर स्वयंपाकामध्ये जरूर असावा, पण मर्यादित स्वरूपातच असणे आरोग्यदायी असते. फळभाज्या व पालेभाज्या स्वच्छ धुवून घ्याव्यात. भेंडी, पडवळ, वांगी, कारले, दोडका, मुळा, पालक, तोंडली आदि भाज्या वापराव्यात.

## बदलते तंत्रज्ञान

# 'कोडॅक'ने आठ टीव्ही केले लाँच, किंमत दहा हजार!


ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स उत्पादक SPPL ने आज त्यांचे नवीन कोडक टीव्ही मॉडेल्स लाँच केले आहेत. ब्रँडने ३२, ४०, ४२ आणि ४३-इंच मॉडेलमध्ये Realtek प्रोसेसरद्वारे समर्थित Kodak 9XPRO सेरीज १०,४९९ रुपयांपासून लॉन्च केले. याशिवाय, कंपनीने २७,९९९ रुपयांपासून सुरू होणाऱ्या C- PRO सीरीज अंतर्गत ५०, ५५ आणि ६५-इंच 4K Google TV मॉडेल्स देखील सादर केले आहेत. KODAK 4K QLED मॅट्रिक्स सेरीजचा ७५-इंच प्रकारदेखील ९८,८८८ रुपयांच्या सुरुवातीच्या किमतीत लॉन्च करण्यात आला आहे.

KODAK 9XPRO TV Android 11, 1GB RAM आणि 8GB ROM द्वारे समर्थित आहे, तर KODAK CA PRO मालिका 4K UHD डिस्प्ले, डॉल्बी ऑडिओ स्टिरीओ बॉक्स स्पीकरद्वारे 40W ऑडिओ आउटपुट आणि इतर अंगभूत ॲप्ससह सुसज्ज आहे. KODAK ७५-इंचाचा 4K QLED TV QLED 4K डिस्प्ले, 2GB RAM आणि 16GB अंतर्गत स्टोरेजसह येतो.

Kodak 9XPRO टीव्ही मालिका ही एक प्रीमियम श्रेणी आहे, जी Android 11 वर आधारित आहे आणि त्यात ARM Cortex A55 4 Realtek प्रोसेसर आहे. टीव्ही डॉल्बी डिजिटल ध्वनी आणि ३०थ स्पीकर आउटपुटसह येतो, जो इमर्सिव्ह ऑडिओ देते. हे अंगभूत Netflix, Google सहाय्यक आणि Chromecast सारखी अखंड कनेक्टिव्हिटी देते. या मालिकेत नेटफ्लिक्स, प्राइम व्हिडिओ, डिस्ने+ हॉटस्टार आणि ॲपल टीव्ही सारख्या लोकप्रिय प्लॅटफॉर्मसह ६,००० हून अधिक ॲप्स आणि गेम उपलब्ध आहेत. ही मालिका ३२-इंच HD रेडी व्हेरिएंटसह उपलब्ध आहे, तर इतर मॉडेल्समध्ये फुल एचडी डिस्प्ले आहेत.

कोडॅक टेलिव्हिजनची नवीन लाँच झालेली मालिका आघाडीच्या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असेल. Kodak 9XPRO TV चे ३२, ४० आणि ४३-इंच मॉडेल्स, ५०, ५५ आणि ६५-इंच C- PRO Google TV आणि ७५-इंचाचे मॅट्रिक्स QLED TV -mazon India वर सादर केले जातील. त्याच वेळी, Kodak 9XPRO TV चे ३२, ४२ आणि ४३-इंच मॉडेल्स, ५० आणि ६५-इंच C- PRO Google TV आणि ७५-इंच 4K QLED TV Flipkart वर प्रदर्शित केले जातील.

# आंतरराष्ट्रीय चित्रकार बाबुराव सडवेलकर



## निमित्त

बाबुराव नारायण सडवेलकर (२८ जून १९२८-२३ नोव्हेंबर २०००) हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे महाराष्ट्रीय चित्रकार होते. त्यांचा जन्म वेंगुर्ले (सिंधुदुर्ग जिल्हा) येथे झाला असून त्यांचे शालेय शिक्षण कोल्हापूर येथील राजाराम हायस्कूलमध्ये व महाविद्यालयीन शिक्षण राजाराम कॉलेजमध्ये झाले.

शालेय जीवनातच चित्रकार होण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्या ठायी निर्माण झाली व ह्या प्रेरणेने त्यांनी 'सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट ', मुंबई येथे उच्च कलाशिक्षणासाठी प्रवेश घेतला. रंग व रेखाकला विषयाची जी. डी. आर्ट ही पदविका त्यांनी संपादन केली. त्यानंतर 'सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट'मध्ये विभागात अधिव्याख्याता म्हणून अध्यापन केले.

अध्यापन करीत असताना 'फुलब्राइट स्मिथमुंट' उपकमांतर्गत शिष्यवृत्ती मिळवून ते अमेरिकेलागेले व आधुनिक कलाशिक्षण-पद्धतींचा व तंत्रांचा तेथे त्यांनी अभ्यास केला. तत्पूर्वी अधिव्याख्याता असताना ते बॉंबे ग्रूप ऑफ आर्टिस्टचे सभासद होते. या ग्रूपतर्फे त्यांनी सहा वर्षे प्रदर्शने भरविली. सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या रूपभेद या कला नियतकालिकाचे ते संपादक होते. १९६७ साली महाराष्ट्र राज्याच्या कला संचालनालयाच्या कला संचालकपदी त्यांची नियुक्ती झाली. कला संचालक म्हणूनही त्यांची कारकीर्द भरीव व संस्मरणीय ठरली. १९५५ ते ७४ या काळात त्यांनी स्वतःच्या चित्रांची सहा एकल प्रदर्शने (वन मॅन शो) भरविली. त्याचप्रमाणे अमेरिकेत प्रॉव्हिडन्स, ऱ्होड आयलंड व न्यूयॉर्क येथे त्यांनी स्वतःच्या चित्रांची एकल प्रदर्शने भरविली. अनेक आंतरराष्ट्रीय कलाप्रदर्शनांतून व कलामहोत्सवांतून त्यांची चित्रे प्रदर्शित झाली.

अमेरिकेत १९५० ते ६० या दशकात बहरलेला पाश्चात्त्य अमूर्त (बस्ट्रॅक्ट) चित्रकलेचा नवप्रवाह मुंबईच्या कलाक्षेत्रात रूजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. पॉल क्ले या स्विस आधुनिक चित्रकारांचा त्यांच्यावर प्रभाव जाणवतो. त्यांची अमूर्त शैलीतील वैशिष्टयपूर्ण गाजलेली चित्रे म्हणजे वन वर्ल्ड, लूनॅटिक, इमेज ऑफ द सिटी, फ्लाइट ऑफ द लूनर रॉक, फ्लोटिंग सिटीज इत्यादी. त्यांच्या अमूर्त चित्रांतील प्रतिमा वस्तूच्या सारभूत तत्त्वाच्या सूचक असतात. त्यांच्या चित्रांतील प्रतिमा-प्रतीकांतून रूपकात्मक, गूढ, आध्यात्मिक भाव सूचित केले जातात. त्या दृष्टीने चित्रांची शीर्षकेही अन्वर्थक वाटतात. त्यांच्या चित्रांमध्ये साधलेल्या रंग व आकार यांच्या सुसंवादी मेळातून अपूर्व सौंदर्य प्रतीत होते. व्यक्तिचित्रे रंगविण्यातही त्यांनी असामान्य प्रावीण्य मिळविले.

सुरूवातीच्या काळात त्यांनी विपुल व्यक्तिचित्रे रंगविली. बॉबी, रीटा, दादाजी, गे हेम्स, विजू ही त्यांनी रंगविलेली काही उत्कृष्ट व्यक्तिचित्रे होत. चेहऱ्यावरील भावदर्शनातून व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे, ही त्यांच्या व्यक्तिचित्रांमागील प्रेरणा होती. तैलरंगाप्रमाणेच जलरंग-माध्यमावरही त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. मुंबईतील अनेकविध स्थळांची शेकडो चित्रे अपारदर्शक रंगांत रंगवून त्यांनी मुंबईचे आगळेवेगळे रंगमय सचित्र दर्शन घडवले.

मुंबई दूरदर्शनवरून त्यांनी अनेक कलाविषयक कार्यक्रम सादर केले. चित्रकथी या लोककला-परंपरेवर त्यांनी अनुबोधपट तयार केला. चित्रकला वअन्य ललित कला यांविषयी त्यांनी सैद्धांतिक व उपयोजित स्वरूपाचे मौलिक लेखनही केले आहे.

वर्तमान चित्रसूत्र (१९९६) हा त्यांचा कलाविषयक लेखसंग्रह प्रसिद्ध आहे. त्यांना अनेक मानसन्मान लाभले अनेक संस्थांमध्ये त्यांची चित्रे कायमस्वरूपी संग्रहीत करण्यात आली आहेत. मुंबई येथे त्यांचे निधन झाले.

**-श्री. दे. इनामदार**

## क्लिक...क्लिक...!



(छाया : तन्वी पवार)

**पनवेल : पावसाला दमदार सुरुवात झाली असून रानभाज्यांसह चविष्ट मुठेही बाजारात विक्रीसाठी येऊ लागले आहेत.**

## आरोग्य प्रहर



# पांढरा कांदा रोज खा, शरीराला मिळतील फायदे!

कांदा हा आरोग्याचा खजिना मानला जातो. होय, कुठल्याही भाजीची चव कांद्याशिवाय फिकी पडते. त्याचबरोबर सलाडमध्येही कांद्याचा वापर केला जातो. लाल कांदा जरी घरात वापरला जात असला तरी तुम्हाला माहित आहे का पांढरा कांदा तुमच्यासाठी खूप फायदेशीर आहे. पांढरा कांदा अनेक समस्या दूर करण्याचे काम करतो. त्याचबरोबर कांद्याचे सेवन केल्याने पचनसंस्था मजबूत राहते, कारण यात फायबरचे प्रमाण जास्त असते जे पचन आरोग्य मजबूत करते. याशिवाय कांद्यामध्ये प्रीबायोटिक्स असतात जे पोट निरोगी ठेवण्यास मदत करतात.

पांढरा कांदा केसांसाठी खूप फायदेशीर आहे.

जर तुमच्या डोक्यात कोंड्याची समस्या असेल तर पांढ्या कांद्याचा रस वापरावा.

तुम्ही पांढऱ्या केसांच्या समस्येने त्रस्त असाल तेव्हा तुम्ही दररोज पांढ्या कांद्याचे सेवन सुरू करावे.

पांढ्या कांद्यामध्ये अनेक पोषक घटक असतात जे आपल्या शरीरातून खराब कोलेस्ट्रॉल काढून टाकण्याचे काम करतात. अशात जर तुम्हालाही बॅड कोलेस्ट्रॉलची समस्या असेल तर तुम्ही रोज पांढरा कांदा खाण्यास सुरुवात करावी. यामुळे तुमचे कोलेस्टेरॉल नियंत्रित होईल.

पांढ्या कांद्याचे सेवन केल्याने हृदयाशी संबंधित समस्या दूर होतात. यात अँटी-इंफ्लेमेटरी हिरड्या असतात ज्यामुळे आपला रक्तदाब जास्त होऊ देत नाही आणि रक्ताची गाठ तयार होत नाही. त्यामुळे जर तुम्हाला हृदयाशी संबंधित समस्या असेल तर तुम्ही पांढ्या कांद्याचे सेवन सुरू करावे.

**(येथे दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# भाजपचा विचार सर्वत्र पोहचवा

## पाली येथे प्रदेश सदस्य राजेश मपारा यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

भाजपचा प्रत्येक कार्यकर्ता एकमेकांना प्रोत्साहन देणारा आहे. भाजपचा विचार सर्वदूर पोहचविण्याचे कार्य कार्यकर्त्यांनी करावे, असे आवाहन भाजप महाराष्ट्र प्रदेश सदस्य राजेश मपारा यांनी केले. सुधागड तालुक्यातील पाली येथे मोदी @ ९ जनसंपर्क अभियानांतर्गत आयोजित तालुका, जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्ता बैठकीत ते बोलत होते.




या वेळी मपारा म्हणाले की, भाजप नावाचे छोटेसे रोपटे आता वटवृक्ष झाले आहे. भाजपचा वटवृक्ष करण्यामध्ये पक्षाच्या कार्यकर्त्यांचा मोलाचा वाटा आहे. ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी पक्ष वाढीसाठी काम केले आणि आता त्याच पक्षाच्या माध्यमातून देशगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी आता सेवा, सुशासन, प्रगती आणि गरीबांचे कल्याण करीत आहेत. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी भाजपला मोठे करण्यासाठी आपल्या आयुष्याचे अनमोल क्षण वेचले. त्याच पक्षाच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्राला मोठे करण्याचे काम अहोरात्र करीत आहेत. भाजपची ओळख नेहमीच कार्यकर्त्यांमुळे कायम राहिली आहे. इतर पक्षांसाठी त्यांचा परिवार हे सर्वस्व आहे. भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्यासाठी राष्ट्र हे त्याचा परिवार आहे. कार्यकर्त्यांनी पक्षाच्या भविष्याचा वेध घेत विचारमंथन करावे यासाठी आजचे तालुक्याची बैठक महत्त्वाची असल्याचे नमूद करीत, देशात विषारी विचार पेरण्याचे काम सुरू आहे. असे विषारी विचार पेरणाऱ्या पक्षांना डबाबंद करण्याचा संकल्प प्रत्येकाने करावा, असे आवाहन मपारा यांनी केले.

भाजप कार्यकर्त्यांमध्ये एकमेकाच्या एकजूटीतून हा संकल्प सामान्यांच्या घराघरापर्यंत पोहचावा. विकासाची मोठी जबाबदारी आपण सर्व पेलत आहोत. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक अशा सर्वच बाजूने आपला मतदारसंघ कसा विकास करेल यावर जोर द्यायचा आहे, असे मत भाजप नेत्या गीता पारलेचा यांनी व्यक्त केले.

या वेळी सुधागड तालुकाध्यक्ष चंद्रकांत घोसाळकर, महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैशाली मपारा, रमेश साळुंके, अभिजित चांदोरकर, आलाप मेहता यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अंडा पॉईंट व मॅजिक पॉईंट येथे जास्त उंचीच्या वाहनांना बंदी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

मुंबई-पुणे जुन्हा महामार्गावरील अंडा पॉईंट व मॅजिक पॉईंट या ठिकाणी हाईट बॅरीअरला एका ट्रकची जोरदार धडक दिल्यामुळे नुकसान झाले. त्यामुळे या ठिकाणी २.५ मीटर उंचीच्या हाईट बॅरिअर उंचीपेक्षा जास्त उंचीवरील वाहनांना वाहतूक बंदी आदेश जारी करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी या अधिसूचनेनुसार सोमवार (दि. २६)पासून पुढील आदेश होईपर्यंत खालापूर तालुक्यातील बोरघाट हद्दीतील अंडा पॉईंट व वाय जंक्शन मॅजिक पॉईंट या ठिकाणी असलेल्या २.५ मीटर उंचीच्या हाईट बॅरिअर उंचीपेक्षा जास्त उंचीवरील वाहनांना वाहतूक बंदी आदेश जारी करण्यात आला आहे.

संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर जिल्हादंडाधिकारी संदेश शिर्के यांनी कळविले आहे.

# श्रीवर्धनमधील पाच जि. प. शाळांचे अन्य शाळांमध्ये समायोजन

**श्रीवर्धन : बातमीदार**

तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पटसंख्या घटल्याने पाच शाळा बंद करून विद्यार्थ्यांचे नजीकच्या शाळेमध्ये समायोजन करण्यात आले आहे.

पालकांचा विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शिकवण्याकडे कल आहे. अनेक पालक शहरांमध्ये स्थलांतरित झाले असल्याने विद्यार्थ्यांना चौथीपर्यंत इंग्रजी माध्यमाच्या शाळेपर्यंत शिकवून पाचवीपासून र. ना. राऊत विद्यालय, या ठिकाणी दाखल करीत आहेत कारण या ठिकाणी पाचवीपासून सेमी इंग्रजी माध्यम आहे. या विद्यालयामध्ये डी.एड.व बी.एड. झालेले बहुतेक शिक्षक आहेत. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये अजूनही पटसंख्या चार किंवा पाच अशी पाहायला मिळते. त्यामुळे यापुढे जिल्हा परिषदेच्या शाळा बंद होतील की काय? अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

**ज्या शाळांची पटसंख्या कमी आहे अशा शाळेतील विद्यार्थ्यांचे समायोजन नजीकच्या शाळेमध्ये करण्यात आले आहे. तालुक्यातील २० जागांवर या शाळांचे शिक्षक नेमण्यात आले आहेत. अनेक कुटुंबे रोजगारासाठी शहरात गेल्यामुळे पटसंख्या कमी झाली आहे**
**-नवनाथ साबळे,**
**गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती**




# संजय गांधी व श्रावणबाळ योजनेचे जिल्ह्यात एक हजार २७५ अर्ज मंजूर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाच्या शासन आपल्या दारी या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत विविध शासकीय दाखले वाटप शिबिर कार्यक्रम जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने संजय गांधी योजना विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागाच्या योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याकरीता विशेष प्रयत्न केले जात आहेत. तालुकास्तरावर विविध शिबिरांचे आयोजनही करण्यात येत आहे. या शिबिरांमध्ये लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त करून घेऊन तात्काळ मंजूरी देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवानिवृत्ती वेतन योजनेचे एकूण एक हजार २७५ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत.

लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली असून संजय गांधी योजना, रायगड शाखेत सर्वसाधारण ए-२९४अंतर्गत आलेले एकूण ६५७ अर्ज मंजूर, संजय गांधी निराधार अनुदान योजनेत अनुसूचित जाती सी-१३४अंतर्गत आलेले एकूण १९८ अर्ज मंजूर, अनुसूचित जाती सी-१६१अंतर्गत आलेले एकूण ७८ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत.

श्रावणबाळ सेवानिवृत्ती वेतन योजनेंतर्गत सर्वसाधारण-३११२अंतर्गत आलेले एकूण ३३० अर्ज मंजूर, अनुसूचित जाती सी-१४३अंतर्गत आलेले एकूण ८ अर्ज मंजूर, अनुसूचित जमाती सी-१७२अंतर्गत एकूण १० अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. अशा प्रकारे आलेले एकूण अर्ज संख्या एक हजार २७५ अर्ज मंजूर केल्याची माहिती तहसीलदार (संगायो), जिल्हाधिकारी कार्यालय, ज्ञानदेव यादव यांनी दिली आहे.

# खोपोली रोटरी क्लब अध्यक्षपदी डॉ. सावित्री रघुपती

**खोपोली : प्रतिनिधी**

रोटरी क्लब खोपोलीच्या अध्यक्षपदी डॉ. सावित्री रघुपती तर सेक्रेटरी अब्बास कोठारी यांची नियुक्ती रविवारी (दि. २५) माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. शैलेश पालेकर यांनी जाहीर केली. माजी अध्यक्ष सुरेंद्र जोशी यांनी आपली अध्यक्षपदाची जबाबदारी डॉ. सावित्री रघुपती यांच्याकडे दिली.



या वेळी २०२२-२३ वर्षभरात संजय पाटील, सुरेश खेडकर, धर्मराज पाटील, डॉ. रवींद्र टिळक यांना चांगले कायम केल्याबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देण्यात आले. २०२२-२३ या वर्षाचा वर्मा मेमोरियल पुरस्कार डॉ. शेखर जांभळे यांच्या सहज सेवा फाउंडेशनला देण्यात आला. डॉ. सावित्री रघुपती यांनी २०२३-२४ या वर्षाची बोर्ड मेंबरची यादी जाहीर केली. कार्यक्रमात रोटरी क्लब खोपोली सहा जणांनी नवीन मेंबरशिप घेतली. नवनियुक्तांचे अभिनंदन करण्यात आले.

# घुम येथे साहित्यवाटप

**म्हसळा : प्रतिनिधी**

आम्ही गिरगावकर टीम मुंबई आणि श्री रविप्रभा मित्र संस्था रायगड यांच्या माध्यमातून घुम ग्रामस्थ मंडळाचे उपाध्यक्ष श्रीकांत बिरवाडकर यांच्या प्रयत्नाने नुकतेच राजिप शाळा घुम येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊवाटप करण्यात आले आहे, तसेच रविप्रभा मित्र संस्था यांचेकडून अंगणवाडी सेविका, मदतनीस, पोषण आहार बनविणाऱ्या स्वयंपाकी, ग्रामपंचायत शिपाई यांना छत्रीवाटप करण्यात आले.

या वेळी प्रदीप कदम, उदय कळस, दत्तात्रय लटके, पोलीस पाटील निलेश लटके, सचिव नितीन रिकामे, सल्लागार संतोष उद्धरकर, किशोर गुलगुले, नेवरूळ हायस्कूल मुख्याध्यापक मिनेकर, सरपंच केतन आग्रे, सल्लागार पांडुरंग महागावकर, माजी अध्यक्ष प्रकाश जाधव, सचिव प्रसाद महागावकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनस्वी गायकर, महिलाध्यक्षा श्रुती गायकर, अंगणवाडीसेविका अक्षता बिरवाडकर उपस्थित होते.




## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल जय आशापुरा डेव्हलपर्स तर्फे राजेश गोरी रा. डोंबिवली ह्यांनी मौजे रीस, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे रीस, ता. खालापूर, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| रीस | संजीव मधुकर मांडे संध्या संजीव मांडे | १२७ | ६/अ/११ | ०.०४.८९ | ४८.९० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५** दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत ह्याची नोंद घ्यावी.

ता. २७/०६/२०२३
पनवेल

**सही/-**
**अॅड. प्रधान मधूकर पाटील**
१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स, ता.पनवेल, जि. रायगड
मोबाईल ९३२४३७५५०२



## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र.२,३ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**
**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./२७/२०२३**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ, टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. — **वादी**

**विरूद्ध**

१) श्री. प्रशांत अरुण पिंगळे
१२०१/१२०२, मंगोलिया अपार्टमेंट, अधिराज गार्डन, प्लॉट नं. ३२, सेक्टर-५, खारघर, जि. रायगड ४१०२१०
**२) श्री. वाल्मिकी गोविंद वाणी**
पत्ता : रुम नं. बी/७०३, प्लॉट नं.५, स्काय लाईन रेसीडेन्सी, सेक्टर-८, कामोठे, जि.- रायगड ४१०२०९
**३) श्री. विनोद रावजी पोकर**
पत्ता : बी-३०१, आदित्य को.ऑप.हौ. सोसायटी, प्लॉट नं.५, सेक्टर-८, खारघर, नवी मुंबई ता.पनवेल, जि. रायगड ४१०२०९
४) श्रीमती शामली प्रशांत पिंगळे
१२०१/१२०२, मंगोलिया अपार्टमेंट, अधिराज गार्डन, प्लॉट नं. ३२, सेक्टर-५, खारघर, जि. रायगड ४१०२१० — **प्रतिवादी**

**दावा रुपये २५,०२,२८८/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. १५/७/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.
आज दि. २१/६/२०२३ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन (रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.

सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग
रायगड व रत्नागिरी जिल्हा



## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. १ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**
**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./२३/२०२३**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल** — **वादी**

**विरूद्ध**

**१) श्री. सुनिल त्रिंबक गायकर**
घर नं. १६७३, निळजेपाडा, दहिसर, डोंबिवली (पूर्व) लोढा हेवन, ता. ठाणे, जि. ठाणे - ४२१२०१
२) श्री. प्रफुल रामचंद्र सकपाळ
ओल्ड रमाबाई सहकार नगर, आर.टी.ओ.ई ई, हायवेच्या पाठीमागे, घाटकोपर (पूर्व) ४०००७७
३) श्री. प्रमोद विलास वाघमारे
रुम नं. २२, अजिंक्य को.ऑ.हौ.सोसायटी, प्लॉट नं. २२०, सेक्टर २, चारकोप, मुंबई, कांदिवली (पश्चिम) ४०००६७ — **प्रतिवादी**

**दावा रुपये २,०३,९७१/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. १५/७/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.
आज दि. २१/६/२०२३ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन (रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.

सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग
रायगड व रत्नागिरी जिल्हा



## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. ३ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**
**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./२३/२०२३**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल** — **वादी**

**विरूद्ध**

१) श्री. सुनिल त्रिंबक गायकर
घर नं. १६७३, निळजेपाडा, दहिसर, डोंबिवली (पूर्व) लोढा हेवन, ता. ठाणे, जि. ठाणे - ४२१२०१
२) श्री. प्रफुल रामचंद्र सकपाळ
ओल्ड रमाबाई सहकार नगर, आर.टी.ओ.ई ई, हायवेच्या पाठीमागे, घाटकोपर (पूर्व) ४०००७७
**३) श्री. प्रमोद विलास वाघमारे**
रुम नं. २२, अजिंक्य को.ऑ.हौ.सोसायटी, प्लॉट नं. २२०, सेक्टर २, चारकोप, मुंबई, कांदिवली (पश्चिम) ४०००६७ — **प्रतिवादी**

**दावा रुपये २,०३,९७१/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. १५/७/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.
आज दि. २१/६/२०२३ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन (रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.

सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग
रायगड व रत्नागिरी जिल्हा



## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय: हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ, प्रभादेवी, मुंबई-४०००१३.
दूरध्वनी क्र. ०२२ - ६९३२८१११/ ६९३२८१०७
E-mail: mlwbconteeg@gmail.com, संकेतस्थळ: www.mlwb.in / www.public.mlwb.in

### नोटीस

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये नोटीस देण्यात येते की, खाली दर्शविलेल्या आस्थापना / संस्थांमधील कामगार / कर्मचाऱ्यांच्या दिनांक ३१ डिसेंबर २०१९ पर्यंतच्या पगार, बोनस वगैरे सारख्या अवितरीत संचयनाच्या रकमा त्यांना न दिल्या गेल्याने मंडळाकडे दिनांक ३१ मार्च २०२३ पर्यंत जमा झालेल्या आहेत. अशा व्यक्तीच्या नावाची यादी इत्यादी तपशील महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३)(अ) अन्वये संबंधित आस्थापनेच्या/संस्थेच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावा.

संबंधित व्यक्तींना सदर रकमेचा परतावा मिळण्यासाठी त्यांचे संपूर्ण नाव व पत्ता, आस्थापना/संस्थेचे नाव व पत्ता, तिकीट नंबर, हुद्दा व कोणत्या महिन्याची व वर्षाची रक्कम आहे इत्यादी तपशील देऊन आपल्या आस्थापनेच्या शिफारस पत्रासह कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्याकडे वरील पत्यावर दोन प्रतींमध्ये अर्ज सादर करावा.

| आस्थापनेचे नांव | रक्कम |
|---|---|
| ठाणे / रायगड | रुपये पैसे |
| **ठाणे** | |
| अल्काइल अमाइन केमिकल्स लि. | ६१७११ |
| ऑटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चर्स प्रा. लि. | ११९०९२४.७० |
| असाही इंडिया ग्लास लि. | ६४०२४६.०० |
| भारत बिजली लि. | ७९६४८.६८ |
| बायर कॉर्प सायन्स लि. | २८६५५.०० |
| भारत बिजली लि. | ८८५२४.६३ |
| सेंच्युरी रेयॉन | ३७००६२.०० |
| कॉन्व्हर्ज्स इंडिया सर्व्हिसेस प्रा. लि | १७०२६१.०० |
| कॉन्व्हर्ज्स इंडिया सर्व्हिसेस प्रा. लि | १३४०३८.०० |
| कॉन्व्हर्ज्स इंडिया सर्व्हिसेस प्रा. लि | ६२०७२०.०० |
| क्लिअर ट्रिप प्रा लि. | १०४०२९.०० |
| डिफिन्स निटिंग इंडस्ट्रीज प्रा. लि. | २२६२०.०० |
| जी.जी दांडेकर इलेक्ट्रिक कं लि. | १७००००.०० |
| गीब्स हेल्थकेअर सोल्युशन प्रा. लि. | ५३४४६३.०० |
| हॉकिन्स कुकर्स लि. | ४९७५५५.०० |
| आय सी आय सी आय सिक्युरिटी लि. | १२३१८५.०० |
| कुवरजी देवशी कं. प्रा. लि. | २४७२.०० |
| मेयर ऑरगॅनिक्स प्रा. लि. | ७७६४५८.०० |
| एम.एस.आर.टी.सी (ठाणे डिव्हिजन) | ७५३७०.०० |
| एम.एस.आर.टी.सी (पालघर डिव्हिजन) | ६३३४९.०० |
| नवनीत मोटर्स प्रा. लि. | ४१७६६.०० |
| नापतोल ऑनलाइन शॉपिंग प्रा. लि | १९०९४३.०० |
| ऑरेंज बिजनेस सर्व्हिस इंडिया टेक्नोलॉजी | १९४१.०० |
| सिक्युरिटी अॅण्ड पर्सनल सर्व्हिसेस प्रा. लि. | ५५७३२.०० |
| सुखी फॅसिलीटी सर्व्हिसेस प्रा. लि. | ९४१०.०० |
| सविता ऑइल टेक्नॉलॉजीज लि | १०९३.०० |
| सासी रिट्रेडिंग एंटरप्राइजेस | ३८८५.०० |
| टेकसोन्स लि. | ५३४९६८.०० |
| टर्टलमेंट इंन्शुरन्स ब्रोकींग सर्व्हिसेस प्रा. लि. | १६७८३.०० |
| **रायगड** | |
| बालाजी एंटरप्राइजेस | १६२३६.०० |
| बॉम्बे ब्रेवरीज लि. | २३६७४.०० |
| एक्साइड इंडस्ट्रीज लि. | १३५२७२.०० |
| थरमॅक्स लि. | १७६२४९.०० |

**स्वाक्षरित/-**
**कल्याण आयुक्त**
**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**

उपरोक्त जाहीर केलेल्या अवितरीत संचयनाच्या न दिल्या गेलेल्या पगार वगैरे सारख्या रकमांमध्ये मंडळाकडे दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत जमा झालेल्या आणि मागील सलग तीन वर्ष नोटीसीद्वारे जाहीर केलेल्या रकमांचा महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये समावेश करण्यात आलेला नाही. तसेच या रकमांमध्ये दिनांक १.०४.२०२० ते ३१.०३.२०२३ या तीन वर्षांच्या कालावधीत मंडळाकडे जमा झालेल्या सर्व रकमांचा समावेश करण्यात आलेला आहे.

# रस्ते अपघात रोखण्यासाठी जनजागृती

## अजिवली येथे महामार्ग पोलिसांकडून प्रबोधन

**पनवेल : वार्ताहर**

महामार्गावर अपघातांचे प्रमाण वाढले आहे. या अपघातांमध्ये वाहनचालक निष्कजीपण हा एक अपघातांमागील प्रमुख कारण आहे. त्यामुळे वाहन चालवताना कोणकोणते उपाय महत्वाचे आहे. या संदर्भात अजिवली येथील जनता माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेजमध्ये अपघात कमी करण्यासाठी घ्यावयाची दक्षता व करावयाच्या उपाययोजना तसेच गोल्डन हवर्सचे महत्व याचे अनुषंगाने रस्ते सुरक्षा अभियान व जन जागृती मोहीम या विषयावर पळस्पे महामार्ग पोलीस केंद्राचे प्रभारी अधिकारी तथा पोलीस उप निरीक्षक गणेश बुरकुल यांनी प्रबोधन केले.



महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे हद्दीतील जुना मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील जनता माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज अजिवली या ठिकाणी महाराष्ट्र राज्य अपर पोलीस महासंचालक रवींद्र कुमार सिंगल यांच्या संकल्पनेतून महामार्ग पोलीस रायगड परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, महामार्ग पोलीस रायगड विभागाचे पोलीस उप अधीक्षक घनश्याम पालंगे, महामार्ग पोलीस पनवेल विभाग गौरी मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली महामार्गावर होणारे अपघात, त्याची कारणे व परिणाम तसेच अपघात कमी करण्यासाठी घ्यावयाची दक्षता व करावयाच्या उपाययोजना तसेच गोल्डन हवर्सचे महत्त्व याच्या अनुषंगाने रस्ते सुरक्षा अभियान व जनजागृती मोहीम या विषयावर प्रबोधन पर कार्यक्रम घेण्यात आलेला आहे.

या वेळी वाहतुकीचे नियमाबाबत सविस्तर मार्गदर्शन व चर्चा करून मोटरसायकल चालक हे हेल्मेट असताना ते परिधान न करता मोटरसायकलचा आरशाला किंवा हँडलला लावून मोटरसायकल चालवत असतात. हेल्मेट हे डोक्याचे संरक्षणासाठी आहे ही गोष्ट लक्षात ठेवावी, मोटरसायकल चालवणाऱ्या व्यक्तीने तसेच मागे बसणाऱ्या व्यक्तीने नेहमी हेल्मेटचा वापर करावा. ट्रिपल सीट बसवून मोटरसायकल चालवू नये. धोकादायकरित्या मोटरसायकल चालवू नये, मोटरसायकल चालविताना मोबाईलवर संभाषण करू नये, कोणत्याही प्रकारचे मद्य प्राशन करून मोटरसायकल चालवू नये, १८ वर्षाखालील मुलांनी व लायसेन्स नसलेल्या व्यक्तीने मोटरसायकल चालवू नये, पालकांनी १८ वर्षांखालील अल्पवयीन मुलांना मोटरसायकल अथवा वाहन चालवण्यास देऊ नये, १८ वर्षाखालील अल्पवयीन मुलगा वाहन चालवताना मिळून आल्यास त्यांचे पालकांवर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात येते हे पालकांनी नेहमी लक्षात ठेवावे, पोलिसांना बघून पळून जाताना मोटरसायकल अथवा वाहन अति वेगाने किंवा विरुद्ध दिशेने वाहन चालवू नये, मोटरसायकल किंवा वाहन चालवण्यापूर्वी ते सुस्थितीत असल्याची खात्री करावी, मोटरसायकल किंवा वाहन चालवताना मार्गीका बदलताना व ओव्हरटेक करताना इंडिकेटर चा उपयोग करावा, वाहनचालक यांनी महामार्गावर दिलेल्या वाहतूक चिन्हांचे व सूचनांचे अनुसरून वाहन चालवणे व वाहतुकीचे नियमांचे पालन करणे, रस्ता ओलांडताना पादचारी यांनी फुटपाथ अथवा भुयारी पूलाचा वापर करावा व रस्त्याचे आजुबाजुचे वाहन पाहून सुरक्षित रस्ता ओलांडावा, रस्त्यावर चालताना रस्त्याचे डावे बाजूने न जाता उजव्या बाजूने चालावे, वाहनाच्या क्षमतेपेक्षा जास्त मालाची अथवा प्रवाशांची वाहतूक करू नये, अपघातामधील व्यक्तींना तत्काळ योग्य ती मदत पुरवून झालेल्या अपघाताबाबत ९८३३४९८३३४ / १००/ ११२/ १०८/ ८६५२०८५५०० या क्रमांकावर कॉल करून घटनेबाबत माहिती द्यावी, वाहन चालविताना नियमित सिट बेल्टचा वापर करावा, पावसाळ्यात वाहन चालवताना मोटरसायकल घसरून अपघात होऊ नये या दृष्टीने वाहन चालवावे, ओव्हरटेक करताना काळजीपूर्वक समोरील येणारे वाहनाचा अंदाज घेवून ओव्हरटेक करावे, रात्रीचे वेळी वाहन चालवितांना पुरेशी झोप घेऊनच वाहन चालवावे, हे वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत माहिती देऊन जनजागृती आणि प्रबोधन करण्यात आले.

या वेळी विद्यार्थ्यांना भेटवस्तू म्हणून पेन व बिस्किट पाकीट यांचे वाटप करण्यात आलेले आहे. या वेळी विद्यालयाचे प्राचार्य आर. के. पाटील, ससाणे सर, यादव मॅडम, शिक्षकवृंद आणि १२० विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

### सहकार्य करण्याचे आवाहन

*या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या शिक्षक विद्यार्थी व विद्यार्थिनींना आपापल्या स्तरावर आपापल्या परीने नातेवाईक मित्रमंडळी यांना कार्यक्रमाबाबत माहिती देऊन रस्ता सुरक्षा अभियान व जनजागृती करून अपघाताचे प्रमाण कमी होईल या दृष्टीने प्रयत्न करावेत तसेच मृत्युजंय दुत व स्व. बाळासाहेब ठाकरे अपघात विमाबाबत माहीती दिली व अपघात समयी जखमींना हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आलेले आहे.*

## निवडक

### खारघर येथे अपघातात दोघे गंभीर

**खारघर :** मुंबईकडून पुण्याच्या दिशेने भरधाव जाणाऱ्या ट्रेलरचालकाने समोरील टँकरला जोरदार धडक दिल्याची घटना सोमवारी (दि. २६) सकाळी ७च्या सुमारास घडली. हा अपघात खारघर कोपरा पुलाजवळ घडला असून ट्रेलरमधील दोघे जण किरकोळ जखमी झाले असून अन्य दोघे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे खारघर पोलिसांनी सांगितले. अपघातग्रस्त ट्रेलर आणि टँकर रस्त्याच्या मध्यभागी आल्यामुळे खारघर ते सीबीडीदरम्यान वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या वेळी पुणे, अलिबागच्या दिशेने नोकरी आणि व्यवसायानिमित्त जाणाऱ्या वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागला.

### आश्रमशाळेत जीवनाश्यक वस्तूंचे वाटप



**पनवेल :** अन्न मंत्रालय सल्लागार समिती सदस्य तसेच राष्ट्रीय किसान संघटना महाराष्ट्र प्रदेश मंत्री नरेश भोईर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त चिरनेर येथे स्वामी समर्थ ट्रस्ट संचालित लहान मुलांच्या निवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना जीवनाश्यक वस्तूंचे वाटप केले. या वेळी संदीप पाटील मित्र परिवार नवी मुंबईचे सदस्य संदीप पाटील, संजय पवार, दीपक पाटील, सुनील कुरकुटे, विजय चव्हाण, दिनेश ठाकूर, मयूर चिपळेकर, राकेश कडू, अक्षय पाटील, अमित खारकर, विनायक थोत्रे, अक्षय काळे, ऋषीकेश ओवलेकर, प्रशांत कारंडे, रोहित खंडागळे, कुंदन म्हात्रे, शरद म्हात्रे, उमेश टोके, विश्वास शिंदे व त्यांचा मित्रपरिवार उपस्थित होता.

### छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन

**पनवेल :** वंचित बहुजन आघाडी पनवेल शहराच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी पक्षाचे महासचिव अविनाश अडगले , रिपब्लिकन नेते नरेंद्र गायकवाड, शशिकांत कळवेकर, नवकेतन गायकवाड, प्रोफेसर प्रफुल्ल भोसले, अॅड. नीलम भोसले, निशा गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.



## बैलोंडेखार येथे कृषी संजीवनी सप्ताह दिन

**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील बैलोंडेखार येथे कृषी संजीवनी सप्ताहाचे आयोजन कृषी विभागामार्फत करण्यात आले होते. कार्यक्रमात महिलाना आहार व आरोग्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

यात आहारातील विषमुक्त भाजीपाल्यांचे महत्त्व पटवून देण्यात आले तसेच महिलांना परस बागेतील बियाण्यांचे वाटप करून, कृषी विभागाच्या सर्व योजनांची माहिती देण्यात आली. २५ जून ते १ जुलैदरम्यान कृषी संजीवनी सप्ताहाचे आयोजन सर्वत्र करण्यात आले आहे. कार्यक्रमाला आशा वर्कर वनिता कासुकर आणि कृषी सहाय्यक विभावरी चव्हाण तसेच बचत गटाच्या शेतकरी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



## शाहू महाराज जयंतीनिमित्त व्याख्यान

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या, सानपाडा शाखेतर्फे, २६ जून राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्यात आली. या निमित्ताने सामाजिक न्याय या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

तुर्भे येथील, शेतकरी शिक्षण संस्थेच्या डॉ. सी. वि. सामंत माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये व्याख्यान झाले. विषमतेचे माहेर घर असलेला समाज. जाती-जातीत विषमता. स्त्री-पुरूष हक्कामधील विषमता. आर्थिक विषमता. अशा विषमतावादी वातावरणात मिळणारा न्यायही विषमच असतो. समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी, सामाजिक न्यायाची घडी बसवण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात आल्या.

या उपाययोजना सुचलेले व त्या अमलात आणणाऱ्यांमध्ये, 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज' प्रमुख होते. सामाजिक विषमतेमुळे सामाजिक न्यायाची पायमल्ली होत होती. धर्माच्या जाचक नियंत्रणामुळे मूठभर लोक सोडले तर इतर सर्व समाज शिक्षणापासून वंचित होता. राजर्षी शाहू महाराजांनी सर्वांना शिक्षणासाठी शाळांची व्यवस्था केली. त्याबरोबर विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतिगृहांचीसुद्धा सोय केली. इतकेच नाही तर सर्व मुलांना शिक्षण सक्तिचे केले. जे पालक मुलांना शाळेत पाठवणार नाही त्यांना दंड आकारण्यात आला.

ज्या सामाजिक न्यायाच्या अभावामुळे बहुसंख्य समाज शोषणाची, गुलामगिरिची व अज्ञानाची वाट चालत होता; त्या समाजाला राजर्षी शाहू महाराजांनी कायदेशीर सामाजिक सुधारणा करून आत्मसन्मानाच्या, समानतेच्या व ज्ञानाच्या महामार्गावर आणले. साथींनो आपणही शाहू महाराजांचा सामाजिक न्यायाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करूया असा संदेश देण्यात आला.

अशोक निकम यांनी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक चतुर व उपमुख्याध्यापिका कोळी यांचे सहकार्य लाभले.



## पोस्ट योजना, आधार, पॅन कार्ड शिबिर



**नवी मुंबई : बातमीदार**

धिरज पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट आणि सावली असंघटीत महिला कामगार संघटना याच्या माध्यमातून नागरिकांसाठी पोस्ट योजना, आधार कार्ड, पॅन कार्ड शिबिर आयोजित करण्यात आले होते.

शिवसेनेच्या पदाधिकारी व संस्थेच्या अध्यक्षा राजेश्री येवले यांनी याबाबतचे शिबिर सानपाडा येथील त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित केले होते. या शिबिरात यासह शासनाच्या विविध योजनांबाबत माहिती देण्यात आली.

तब्बल ६५ नागरिकांनी या शिबिराचा फायदा घेतला. या वेळी एलआयसीची अपघात पॉलिसी अनेकांनी काढून घेतली. पोस्टाची सेव्हिंग खाते सुरू करण्यात आली. पॅन आधारशी लिंक करण्यात आले. लहान मुलांची नवीन आधार कार्ड काढण्यात आली. आधार मोबाईलशी लिंक करण्यात आली.



**पनवेल : खांदेश्वर पोलीस ठाण्याचे नवनियुक्त प्रभारी अधिकारी चंद्रकांत लांडगे यांना माजी उपमहापौर सीताताई पाटील, चारूशीला घरत, माजी नगरसेवक अॅड. मनोज भुजबळ, प्रकाश बिनेदार, एकनाथ गायकवाड, माजी नगरसेविका अॅड. वृषाली वाघमारे, राजश्री वावेघर तसेच भीमराव पोवार आदींनी शुभेच्छा दिल्या.**

## कोपरी शाळेत आषाढी वारीनिमित्त दिंडी



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई मनपा शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांच्या संकल्पनेतून नवोपक्रमांतर्गत शाळा क्रमांक ३० कोपरी शाळेत मंगळवारी (दि. २७) भव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

यात विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी पारंपारिक पोशाख परिधान करून विठूरायाच्या नामाचा गजर करत स्वच्छता, आरोग्य, शिक्षण या विषयांवर विविध घोषणा देत जनजागृती केली. तसेच टाळ मृदुंगाच्या साथीने अभंग गायन, फुगड्या, गोल रिंगण या दिंडीतील कार्यक्रमांचा ही आनंद सर्वांनी घेतला शालेय परिसरात भक्तिमय वातावरणाची निर्मिती या माध्यमातून झाली. या कार्यक्रमावेळी सामाजिक कार्यकर्ते परशुराम ठाकूर, शाळेच्या मुख्याध्यापिका तसेच शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.

या वेळी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेतील सहशिक्षक डॉ. विलास भिसे यांनी विद्यार्थ्यांना उपक्रमाचे महत्त्व समजावून सांगितले समाज जागृती करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

## नाट्य कलावंतांचा सन्मान

**उरण : वार्ताहर**

पैशाने तुटली नाती या हासूराम पाटील लिखित आणि धनेश्वर म्हात्रे यांनी दिग्दर्शन केलेल्या हृदयस्पर्शी नाटकातील सर्व कलाकारांचा नाटकार हसूराम पाटील यांच्या वतीने खास सन्मान करण्यात आला.



नियोजित कार्यक्रम बळीराम रामा घरत यांच्या पाली परळी येथील घरत फार्म हाऊसवर आयोजित करण्यात आला होता. या वेळी प्रथम सर्व कलाकारांनी पाली येथील बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले. नाटककार हासुराम पाटील यांची कन्या प्रज्ञा पाटील हिच्या विवाह प्रित्यर्थ, पैशाने तुटली नाती या नाटकात भूमिका बजावणाऱ्या कलाकारांच्या कलेचा सन्मान करण्याच्या हेतूने, नाटककार हासूराम पाटील यांच्या वतीने कलाकारांना सन्मानचिन्ह देऊन, गौरविण्यात आले.

उरण, नवी मुंबईमधील नाट्य कलाकारांची अष्टगंध कला मंच हि एक नावारूपाला आलेली, नाट्यसंस्था आहे. या नाट्यसंस्थेने आजवर नाट्य चळवळ उभारून, रंगभूमीला वर्षानुवर्ष समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. अष्टगंध कलामंचाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे, फार्महाऊसचे मालक बळीराम घरत, दिग्दर्शक धनेश्वर म्हात्रे, नाटककार हासूराम पाटील, माणिक नाईक, रमेश कोळी व प्रज्योत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत नाटकात भूमिका सादर करणाऱ्या कलाकारांचा तसेच दिग्दर्शक व लेखक यांचाही सत्कार करण्यात आला.

यात प्रामुख्याने दिग्दर्शक धनेश्वर म्हात्रे, लेखक हासुराम पाटील ,कलाकार अशोक म्हात्रे ,चेतन पाटील, सुमित कुंभार, वैशाली मोहिते, परेशा सरोदे ,रुचिता म्हात्रे, नवनीत माळी ,रोशन घरत, प्रसाद कडू आदी कलाकारांचा समावेश आहे. दरम्यान या अनुषंगाने निर्माण झालेल्या नाट्यमय वातावरणात ,उपस्थित नाट्य कलाकारांनी विविध नाटकातील संवाद सादर करून ,कार्यक्रमाची रंगत वाढवून, संपूर्ण वातावरण नाट्यमय केले होते.

नाटककार हासूराम पाटील, दिग्दर्शक धनेश्वर म्हात्रे यांनी याप्रसंगी नाटकातील गमती जमती व आपले अनुभव कथन केले. कार्यक्रमाला फार्म हाऊसचे मालक बळीराम घरत यांचे विशेष सहकार्य लाभले. सूत्रसंचालन चेतन पाटील यांनी केले.

## दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**नवी मुंबई : बातमीदार**

राजर्षि छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षांत एसएससी बोर्ड परिक्षेमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधून सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या प्रथम तीन क्रमांकाच्या पाच विद्यार्थ्यांचा गुणगौरव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडेकर स्मारकात सुप्रसिध्द अभिनेते, वक्ते राहुल सोलापूरकर यांच्या 'राजर्षि शाहू विचार वारसा' या व्याख्यानानंतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.



या वेळी पालिका आयुक्त राजेश नार्वेकर, व्याख्याते व अभिनेते राहुल सोलापूरकर, समाजविकास विभागाचे उपआयुक्त डॉ. श्रीराम पवार, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त दत्तात्रय घनवट, शिक्षणाधिकारी अरुणा यादव तसेच माजी महापौर सुधाकर सोनवणे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

नवी मुंबई महापालिकेच्या २१ माध्यमिक शाळांतून एसएससी बोर्ड परीक्षेत सर्वाधिक ९३.८० टक्के गुण संपादन करून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली राजर्षि छत्रपती शाहू महाराज विदयालय नमुंमपा माध्यमिक शाळा क्रमांक १०४, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, राबाडा (हिंदी माध्यम) येथील विद्यार्थिनी गायत्रीदेवी मनोजकुमार योगी हिला आयुक्त नार्वेकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

नमुंमपा शाळा क्रमांक १०६, सेक्टर ५, कोपरखैरणे येथील तनुजा पोपट पाटील या विद्यार्थिनीस तसेच नमुंमपा माध्यमिक शाळा क्र. १०४ राबाडा (हिंदी माध्यम) येथील पवनकुमार उमाशंकर यादव या विद्यार्थ्यास नमुंमपा माध्यमिक शाळांतून द्वितीय क्रमांकाचे ९३.४० टक्के गुण संपादन केल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. नितू लालचंद यादव या राजर्षि छत्रपती शाहू महाराज विदयालय नमुंमपा माध्यमिक शाळा क्रमांक १०४, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, राबाडा येथील विद्यार्थिनी तसेच भाग्यश्री अशोक सावंत या नमुंमपा शाळा क्र. १०६, कोपरखैरणे येथील विद्यार्थिनीस ९३.२० टक्के गुण प्राप्त करुन संयुक्तपणे तृतीय क्रमांकाची मानकरी ठरल्याबद्दल सन्मानित केले गेले.

# खालापुरात सर्व कार्यालये एकाच छताखाली!

## नवीन प्रशासकीय इमारतीचे आमदार थोरवेंच्या हस्ते भूमिपूजन

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्याची प्रशासकीय इमारत मध्यवर्ती ठिकाणापासून दूर अंतरावर असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, परंतु खालापूर विकास आराखड्यात नव्याने या ठिकाणी मोठी बाजारपेठ होणार असल्याने भविष्याच्या दृष्टीने ही जागा फायदेशीर असल्याचे आमदार महेंद्र थोरवे यांनी प्रशासकीय इमारतीच्या भूमिपूजनावेळी सांगितले.



सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने प्रशासकीय मान्यता व १० कोटी ३१ लक्ष इतका निधी मंजूर झाला असून या प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते सोमवारी (दि. २६) करण्यात आले. यामुळे तालुक्याच्या ठिकाणी असणारी सर्व शासकीय कार्यालये एकाच छताखाली येणार आहेत.

या कार्यक्रम तहसीलदार आयुब तांबोळी, नगरपंचायत मुख्याधिकारी रश्मी चव्हाण, नगराध्यक्ष रोशना मोडवे, उपनगराध्यक्ष संतोष जंगम, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, खालापूर पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, नगरसेविका शिवानी जंगम, लता लोते, उज्ज्वला निधी, सुप्रिया साळुंखे, नगरसेवक किशोर पवार, महेश जाधव, शिवसेना तालुकाप्रमुख संदेश पाटील, पुंडलिक लोते, पद्माकर पाटील, राजेश गुरव, बाबू पोटे, दीपक लोते, किरण बेलखडे, अमित जगताप, हरेश मोडवे, दीपक पाटील यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

### प्रशासनाने भाजप लोकप्रतिनिधींना डावलले

महाराष्ट्रात युतीचे सरकार असतानाही या सोहळ्यास भाजप जिल्हाध्यक्ष तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, उरणचे आमदार महेश बालदी, पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांना प्रशासनाकडून निमंत्रण देण्यात आले नव्हते. भाजप कार्यकर्त्यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे यांनी यास दुजोरा देत अधिकाऱ्यांवर ताशेरे ओढले आहेत. याबाबत आमदार निरंजन डावखरे यांनी विधान परिषदेत हक्कभंग मांडणार असल्याचे सांगण्यात येत आहे. नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी, निमंत्रणाची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे असल्याचे सांगून जबाबदारी झटकली, तर उपअभियंता राखाडे यांचा फोन नॉट रिचेबल असल्याने त्यांची प्रतिक्रिया समजू शकली नाही.

## निवडक



### शाहू महाराज जयंतीनिमित्त अभिवादन

**म्हसळा** : सार्वजनिक वाचनालयात छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी वैष्णवी कळबासकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, सुनील उमरोटकर, कृषि अधिकारी आर. ए. ढंगारे, श्रीवर्धन कृषि अधिकारी डी. एल. कुंभार, विनोद सोनावणे, पंकज पाटील, दिपाली पालवे, रेणुका पाटील, ग्रंथपाल उदय करडे, पत्रकार संतोष उद्धरकर, मंदार नवघरे, लिपीक सायली चोगले, मदतनीस प्राची मेंदडकर, प्रशांत करडे, सायली अंजर्लेकर आदी उपस्थित होते.

### प्रा. बामणे यांना राष्ट्रभाषा सन्मान



**पेण** : विश्व हिंदी साहित्य सेवा संस्थान प्रयागराज, उत्तर प्रदेश व स्वामी स्वरूपानंद महाविद्यालय हुडको भिलाई, छत्तीसगढ यांच्या संयुक्त विद्यमान घेण्यात आलेल्या द्वि–दिवसीय राष्ट्रीय हिंदी साहित्य संमेलनात भाऊसाहेब नेने महाविद्यालयाचे हिंदी विभाग अध्यक्ष डॉ. देवीदास बामणे यांना हिंदी साहित्यामधील विशेष योगदानाबद्दल राष्ट्रभाषा सन्मानाने सन्मानित करण्यात आले. या सन्मानाबद्दल पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, बापूसाहेब नेने, सचिव बाळासाहेब जोशी, उपकार्याध्यक्ष व खजिनदार संजय कडू, प्रशांत ओक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. धारप, विश्व हिंदी साहित्य सेवा संस्थानचे अध्यक्ष डॉ. शहाबुद्दीन शेख,उपाध्यक्ष डॉ. ओमप्रकाश त्रिपाठी, सचिव डॉ. गोकुलेश्वर कुमार द्विवेदी यांनी अभिनंदन केले.

### नांदगाव हायस्कूलमध्ये शाहू महाराज जयंती



**मुरूड** : छत्रपती शाहू महाराज यांची १४९वी जयंती नांदगाव हायस्कूल येथे मोठ्या उत्सहात साजरी करण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांना राजश्री शाहू महाराज यांच्याविषयीची माहिती सांगण्यात आली. शिक्षक प्रतिनिधी महेश वाडकर यांच्या हस्ते शाहू महाराज यांच्या तसबिरीला पुष्पमाला अर्पण करण्यात आली. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ, प्रतीक पेडणेकर, योगेश पाटील, भरत चव्हाण, महादू अहिरे, दत्तात्रेय खुळपे, रवींद्र ढोले, मयूर चौलकर, संतोष बुल्लू, मिलिंद मोहिते आदी उपस्थित होते.

### गरीब, गरजू विद्यार्थ्यांना वह्यावाटप

**खोपोली** : नगरपालिका हद्दीतील श्रीराम नगर येथील श्रीराम देवस्थान ट्रस्टतर्फे गरीब गरजू विद्यार्थ्यांना वह्या व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष वसंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. कार्यक्रमासाठी सुनील धनवडे, शिवाजी घावटे, कोळेकर, कटके, म्हाप्रळकर, रितेश घावटे, गणेशबुवा पाटील, अमोल पडवळ, रुपेश घावटे, अर्जुन कडवे उपस्थित होते.

### भाजपतर्फे विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप



**मुरूड** : तालुका भाजपतर्फे बोर्ली येथील साने गुरुजी विद्यालयात विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. भाजपचे उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण यांच्या कल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी गणेश कट, तालुकाध्यक्ष महेंद्र चौलकर, उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण, संदीप चिरायू, संजय पाटील, सुनील पाटील व शिक्षक उपस्थित होते. उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण यांनी सांगितले की, प्रत्येक पालकाला आपल्या मुलासाठी दरवर्षी वह्या व पुस्तकावर खर्च करावा लागतो. त्यामुळे एक मदतीचा हात म्हणून भाजपतर्फे वह्यावाटप करून दिलासा देण्याचा आमचा प्रयत्न आहे.



(छाया : सलीम शेख)

**माणगाव : राजिप शाळा उतेखोलवाडी येथील विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यकर्ते नामदेव खराडे यांनी वह्यावाटप केले. या वेळी शाळेचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.**

# श्रीवर्धन तालुक्यामध्ये दमदार पावसाची प्रतीक्षा

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यामध्ये मान्सूनचे आगमन झाले असले तरीही पर्जन्यमान अतिशय तुरळक आहे. मृग नक्षत्र निघाल्यानंतर शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये भातपेरणी केलेली होती. वास्तविक पाहता कोकणात आठ जूनच्या दरम्यान मान्सूनचे आगमन होते, परंतु या वेळह अरबी समुद्रात तयार झालेल्या बिपरजॉय चक्रीवादळामुळे मान्सून लांबला होता.



बिपरजॉय चक्रीवादळ अरबी समुद्रातून गुजरातच्या दिशेने जात असताना श्रीवर्धन तालुक्यात पाऊसदेखील पडला होता. या वादळी पावसानंतर शेतकऱ्यांनी पेरलेले भातबियाणे उगवले होते, मात्र त्यानंतर मान्सून लांबल्याने शेतात उगवलेली भात रोपे करपून जातात की, काय? अशी भीती शेतकऱ्यांना पडलेली होती, परंतु अधून मधून पाऊस शिंतडत असल्याने भाताची रोपे जिवंत राहिली होती. २२ जून रोजी मान्सूनचे आगमन झाले, परंतु पावसाला हवा तसा जोर नसल्याचे पाहायला मिळत आहे.

अधून मधून एखाद दुसरी पावसाची सर कोसळते व पुन्हा वारा सुटला की ढग पुढे जातात. साधारण पहिले सहा–सात दिवस चांगला पाऊस पडल्यानंतर श्रीवर्धन शहरात असलेल्या विहिरी पूर्णपणे भरतात, परंतु अद्याप विहिरी भरतील एवढा पाऊस पडलेला नाही. त्यामुळे पर्जन्यमान तुरळक असल्याचेच दिसून येते.

# आमटेम विद्यालयात विविध स्पर्धा

**नागोठणे : प्रतिनिधी**

२५ जून ते १ जुलै या कालावधीत तालुका कृषी अधिकारी कार्यालय पेण यांचेमार्फत कृषी संजीवनी मोहिमेंतर्गत तालुक्यात विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत. या अंतर्गत सोमवारी (दि. २६) कृषी पर्यवेक्षक, वडखळ स्तरावरील कार्यक्रम पौष्टिक आहार प्रसार दिन आमटेम येथील सरस्वती विद्यामंदिर येथे साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता गुंजाळ यांनी केले. इ. आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांच्या निबंध व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. निबंध स्पर्धेसाठी पौष्टिक तृणधान्याचे आहारातील महत्त्व, पौष्टिक तृणधान्ये– एक उद्योगाची संधी, शेती आणि जीवन हे विषय होते. चित्रकला स्पर्धेसाठी समतोल आहार हा विषय होता. विजेत्या स्पर्धकांना तालुका कृषी अधिकारी पेण सागर वाडकर, सरपंच आमटेम लक्ष्मण तांबोळी, उपसरपंच रवींद्र गायकर यांच्या हस्ते बक्षिस व प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

निबंध स्पर्धेत प्रथम करिष्मा नाईक इ. नववी, द्वितीय प्रिन्स भोईर इ. दहावी, तृतीय हर्ष म्हात्रे इ. नववी यांनी पटकावला. चित्रकला स्पर्धेत प्रथम धनश्री तांबोळी इ. नववी, द्वितीय शर्वरी नाईक इ. नववी व तृतीय ध्रुविल म्हात्रे इ. आठवी यांनी पटकावला. तालुका कृषी अधिकारी पेण यांनी मुलांना पौष्टिक तृणधान्याचे आहारातील महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांना व उपस्थित सर्वांना आपल्या कुटुंबाच्या आहारात पौष्टिक तृणधान्याचा समावेश करण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमासाठी तालुका कृषी अधिकारी पेण सागर वाडकर, कृषि पर्यवेक्षक वडखळ शशिकांत गोसावी, सरपंच आमटेम लक्ष्मण तांबोळी, उपसरपंच रविंद्र गायकर, मुख्याध्यापक सरस्वती विद्यामंदिर आमटेम जे. डी. म्हात्रे, मुख्याध्यापक सेंट्रल स्कूल आमटेम यशोदा पाटील, पोलीस पाटील पुनम गायकर, ग्रामपंचायत सदस्य नाजुका नाईक, वंदना नाईक, ताई तांबोळी, निर्मला सुरेश मोकल, कृषि सहाय्यक आमटेम सुजाता गुंजाळ, कृषि सहाय्यक सतीश गायकवाड, संतोष लोहार, योगेश पवार, संदेश शेडगे, प्राजक्ता बारवे, इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# नागोठणे शहरात पोलिसांचे पथसंचलन

**नागोठणे : प्रतिनिधी**

आगामी आषाढी एकादशी व बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर कायदा सुव्यवस्था व शांतता अबाधित राहावी यासाठी सोमवारी (दि. २६) नागोठणे येथे पोलिसांनी पथसंचलन केले.

नागोठणे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पोमण, उपनिरीक्षक नारायण चव्हाण, सहाय्यक उपनिरीक्षक प्रमोद कदम, हेडकॉन्स्टेबल विनोद पाटील, संदेश सानप, संतोष म्हात्रे यांच्यासह अंमलदार सहभागी होते. पोलीस ठाण्यापासून सुरवात होऊन शहराच्या विविध भागांमध्ये पथसंचलन करण्यात आले.



# आवास येथे विविध दाखल्यांचे वाटप

## ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शासन आपल्यादारी या योजनेंतर्गत विविध योजनांचा लाभ ग्रामस्थांनी घ्यावा, असे आवाहन तहसीलदार विक्रम पाटील तालुक्यातील आवास येथे झालेल्या कार्यक्रमांत केले.

आवास येथे तहसिलदारांच्या हस्ते ग्रामस्थांना विविध दाखल्यांचे वाटप बाबासाहेब नाजरे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमधील स्व. प्रभाकर सदाशिव राणे सभागृहामध्ये सोमवारी (दि. २६) करण्यात आले. शासन आपल्या दारी या योजनेमार्फत ग्रामस्थांना उत्पन्नाचे दाखले, मतदान ओळखपत्र, ७/१२ उतारा, नॉन क्रिमीलेअर दाखले, वय व अधिवास दाखले यांचे वाटप करण्यात आले. या वेळी आवासचे सरपंच अभिजीत राणे, उपसरपंच पुजा राणे, गटविकास अधिकारी मंगेश पाटील, मंडळ अधिकारी सारळ पी. बी. मोकल, तलाठी आवास सावंत, तलाठी धोकवडे ढमढेरे, ग्रामसेवक आवास टि. एन. म्हात्रे, बा. ना. हायस्कूल व ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य भगत व ग्रामस्थ उपस्थित होते.



### रायगडात दिवसभरात ५१ मिमी पावसाची नोंद

**अलिबाग** : जिल्ह्यात गेल्या २४ तासांत सरासरी ५१.८३ मिमी पावसाची नोंद झाली आहे तसेच १ जूनपासून मंगळवारअखेर एकूण सरासरी २७४.५३ मिमी पर्जन्यमानाची नोंद झाली आहे.

अलिबाग १२, पेण १२०, मुरूड ११, पनवेल ७६, उरण ५८, कर्जत ९५.२०, खालापूर ७४, माणगाव ६२, रोहा २७, सुधागड ४४, तळा ३६, महाड २३, पोलादपूर २८, म्हसळा २१, श्रीवर्धन २२, माथेरान १२० मिमी असे आजचे एकूण पर्जन्यमान ८२९.२० मिमी इतके आहे. याची सरासरी टक्केवारी ९.०३ इतकी आहे.

# देवपूर येथील माजी उपसभापतींसह शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर पंचायत समितीच्या माजी उपसभापती अनिता महादेव शिंदे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी युवा सेना राज्य कोअर कमिटी सदस्य विकास गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला.

या वेळी राजिपचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, संपर्कप्रमुख किशोर जाधव, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, नगरसेवक सिध्देश शेठ, विनायक दिक्षित, महिला आघाडी प्रमुख सुवर्णा कदम, सहसंपर्कप्रमुख कृष्णा कदम, उपतालुका प्रमुख सतीश शिंदे, विभाग प्रमुख प्रभाकर पवार, दशरथ उतेकर, सरपंच शिवदास जगदाळे तसेच जगदीश महाडिक, विजयबुवा मोरे, मुंबई मंडळाचे अध्यक्ष सुरेश सकपाळ व पुणे मंडळाचे सेक्रेटरी अरविंद चव्हाण, कॅप्टन काशीराम चव्हाण, मधुकर महाडिक, अनिल महाडिक, विठोबा महाडिक व कार्यक्रर्ते उपस्थित होते.



माजी उपसभापती अनिता महादेव शिंदे, माजी सरपंच शांताबाई सीनकर, आशा जगदाळे, अलका जाधव, सदस्या सुलभा खांडेकर, अलका पवार, महिला आघाडीच्या सदस्य रत्नप्रभा जगदाळे, रमेश पवार, दीपक महाडिक, बाबाराव महाडिक, नितेश मोरे, ज्ञानेश्वर महाडिक, सखाराम उतेकर, माजी सदस्य सिद्धेश गजानन महाडिक यांच्यासह राजेश महाडिक, राजेंद्र महाडिक, मोरगिरी गवळवाडी येथून बाबू भंडारे व त्यांचे सहकारी यांनी आमदार भरत गोगावले यांच्या कार्यक्षम नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत प्रवेश केला.

या वेळी विकास गोगावले यांनी, आमदार भरतशेठ यांनी घेतलेला निर्णय हा योग्यच असून शिंदे सरकार सत्तेत आल्यामुळे या मतदारसंघाचा कायापालट होताना दिसत आहे. या पक्षप्रवेशामुळे या भागातील विकासाला तसेच पक्ष मजबुतीकरणाला नक्कीच मदत होणार आहे. शिवसेनेमध्ये महिला भगिनींसह सर्वांचे स्वागत आहे, असे सांगितले.

### विकासकामांचे भूमिपूजन

या वेळी देवपूर गाव नळ पाणीपुरवठा योजना, देवपूर गाव पवार भावकी सभागृह, देवपूरवाडी व गांजवणे पाणीपुरवठा योजना, देवपूर फाटा कोंडजाई मंदिर ते कोंडवी रस्ता, कोंडजाई वाघजाई प्रवेशद्वार सुशोभीकरण, गांजवणे अंतर्गत रस्ता डांबरीकरण, गांजवणे स्मशानभूमी बांधणे, कोंडजाई माता मंदिर पर्यटनस्थळी सभागृह, कोंडजाई मंदिराकडील रस्त्यासाठी संरक्षण भिंत आदी विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.

# स्वररंगांच्या सरीत रोहेकर झाले चिंब!

**रोहे : प्रतिनिधी**

रोह्याच्या भट सभागृहात ब्राह्मण मंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे चौथे पुष्प शनिवारी (दि. २४) रात्री सादर करण्यात आले. यानिमित्ताने पुणे येथील सुप्रसिद्ध संगित संयोजक मोहन पारसनिस व सहकाऱ्यांच्या स्वररंग या संगीताच्या मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते.

गायक राजेश दातार व गायिका मुग्धा भट–सामंत, आसावरी चितळे यांनी आपल्या सादरीकरणाने रसिकांची मने जिंकली. या गायकांना मोहन पारसनीस, जयंत साने, प्रमोद जांभेकर, हेमंत पोटफोडे आदी वादकांची सुरेल साथसंगत लाभली. सन्मान गोळवलकर यांनी आपल्या उत्तम निवेदनाने रसिकांची मने जिंकली. एकूणच कार्यक्रम रंगला.

नाट्यसंगीत, अभंग व विविध रंग या मैफिलीतील उधळले गेल्याने मैफिल उत्तरोत्तर रंगत गेली. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनाबद्दल रोहेकरांनी ब्राह्मण मंडळ रोहाचे अध्यक्ष अमित आठवले व पूर्ण टीमचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ब्राह्मण मंडळ रोहा सचिव निखिल दाते यांनी तर रौप्य महोत्सव समिती समन्वयक किशोर सोमण यांनी आभार मानले.



# नेदरलँड्सचा विंडीजवर ‘सुपर’ विजय

## व्हॅन बीकने सहा चेंडूंत फटकाविल्या ३० धावा

**हरारे : वृत्तसंस्था**

यंदा भारतात होणाऱ्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या मुख्य फेरी प्रवेशासाठी सध्या सुरू असलेल्या पात्रता फेरीत सोमवारी नेदरलँड्सने ‘सुपर ओव्हर’मध्ये वेस्ट इंडिजचा पराभव केला. विंडीजने सहा बाद ३७४ धावा केल्या असताना नेदरलँड्सने नऊ बाद तेवढ्याच धावा केल्या. त्यामुळे सामना सुपर ओव्हरमध्ये गेला. यामध्ये नेदरलँड्सच्या व्हॅन बीकने सहा चेंडूंत ३० धावा फटकावून काढल्या. प्रत्युत्तरात विंडीजला केवळ आठच धावा करता आल्या.



संपूर्ण सामन्यात तब्बल ७४८ धावांचा पाऊस पडला. वेस्ट इंडिजने निकोलस पूरनच्या (नाबाद १०४) शतकी खेळीच्या जोरावर सहा बाद ३७४ धावा केल्या. त्याला किंगची (७६) साथ मिळाली. त्यानंतर आव्हानाचा पाठलाग करताना निदामानुरुच्या (१११) फटकेबाजीच्या जोरावर नेदरलँड्सने नऊ बाद ३७४ धावा केल्या. सामना बरोबरीत सुटल्यामुळे घेण्यात आलेल्या एका षटकाच्या खेळात नेदरलँड्सने बाजी मारली. या पराभवाने दोन वेळच्या विजेत्या वेस्ट इंडिजच्या मुख्य स्पर्धेत खेळण्याच्या आशा अंधुक झाल्या आहेत. यापूर्वी त्यांना झिम्बाब्वेनेदेखील पराभूत केले आहे. सुपर ओव्हरच्या एका षटकांत व्हॅन बीकने सहा चेंडूंत (४,६,४,६,६,४) ३० धावा कुटल्या. हे आव्हान वेस्ट इंडिजला पेलवले नाही. त्यांनी दोन बाद आठ धावा केल्या.

व्हॅन बीकच्या या तुफानापूर्वी ३७५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना तेजा निदामानुरु आणि कर्णधार स्कॉट एडवर्ड्सने पाचव्या विकेटसाठी १४३ धावांची भागीदारी करून नेदरलँड्सला विजयाच्या आशा दाखवल्या होत्या. या दोघांनी अवघ्या ९० चेंडूंत ही भागीदारी केली, मात्र त्यानंतर नेदरलँड्सने घाईत १४ धावांत तीन गडी गमावले आणि अखेरच्या दोन षटकांत ३० धावा असे समीकरण राहिले. त्या वेळी खेळपट्टीवर असणाऱ्या बीकने ४९व्या षटकातील पहिल्या तीन चेंडूंत १४ धावा घेतल्या. अखेरच्या षटकांत नेदरलँड्सला सहा षटकांत नऊ धावांची आवश्यकता होती, मात्र शेवटच्या चेंडूवर विजयासाठी एक धाव आवश्यक असताना बीक (१४ चेंडूंत २८) बाद झाल्याने सामना बरोबरीत सुटला.

तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना ब्रेंडन किंग (८१ चेंडूंत ७६) आणि जॉन्सन चार्ल्स (५५ चेंडूंत ५४) यांच्या १०१ धावांच्या सलामीनंतर निकोलस पूरनच्या फटकेबाजीने वेस्ट इंडिजचे आव्हान उभे राहिले होते. पूरनने ६५ चेंडूंत १०४ धावांची खेळी करताना नऊ चौकार आणि सहा षटकारांची आतषबाजी केली.

# राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगड जिल्ह्याला दोन पदके



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वरिष्ठ महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धा मुंबई अँटॉप हिल सायन कोळीवाडा येथे आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टींग पदक विजेते आमदार कॅ. तमिल सेलव्हन यांच्या उपस्थितीत झाली. या स्पर्धेच्या महिला गटात रायगडच्या सलोनी मोरे हिने ६३ किलो गटात सुवर्णपदक पटकावले, तर ४७ किलो गटात अमृता भगतने कांस्यपदक जिंकले.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतून जवळजवळ दीडशेहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. अर्जुन पुरस्कार विजेते संजीवन भास्करन, शिवछत्रपती पुरस्कार विजेते संदीप सावंत, महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सरचिटणीस संजय सरदेसाई, ऑलिम्पियन वेटलिफ्टर रंगास्वामी यांच्या उपस्थितीत बक्षीस समारंभ झाला.

या यशाबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्या वतीने अध्यक्ष गिरीष वेदक, सेक्रेटरी अरुण पाटकर तसेच राहुल गजरमल, सचिन भालेराव, माधव पंडित, सुभाष टेंबे, संदीप पाटकर, श्रीनिवास भाटे, यशवंत मोकल, दत्तात्रय मोरे, मानस कुंटे यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# एमपीएलमध्ये अंकित बावणेने एका षटकात मारले सहा चौकार



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलनंतर चाहत्यांना तामिळनाडू प्रीमियर लीग आणि महाराष्ट्र प्रीमियर लीगमध्ये अनेक रोमांचक आणि अद्भूत क्षण पहायला मिळत आहेत. एमपीएललमध्ये सोमवारी कोल्हापूर टस्कर्स आणि ईगल नाशिक टायटन्स यांच्यात सामना खेळला गेला. या सामन्यात कोल्हापूर टस्कर्सने नऊ विकेट्सने मोठा विजय मिळवला. यामध्ये अंकित बावणेने एकाच षटकात सहा चौकार मारून विक्रम केला आहे.

ईगल नाशिक टायटन्स आणि कोल्हापूर टस्कर्स संघातील सामना १०-१० षटकांचा खेळला गेला. या सामन्यात ईगल नाशिक टायटन्सने प्रथम फलंदाजी करताना नऊ गडी गमावून ८९ धावा केल्या होत्या. यानंतर कोल्हापूर टस्कर्स संघ फलंदाजीसाठी उतरला आणि अंकित बावणेने तुफानी खेळी करीत संघाचा विजय निश्चित केला. अंकितने २७ चेंडूंत ११ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ६२ धावा केल्या. या ११ चौकारांपैकी सहा चौकार एकाच षटकात आले. चेन्नई सुपर किंग्जमध्ये महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली खेळणारा प्रशांत सोळंकी या वादळाचा बळी ठरला.

चौथ्या षटकाची जबाबदारी प्रशांत सोलंकीकडे सोपवण्यात आली होती, जे या सामन्यातील त्याचे पहिले षटक होते. अंकिता बावणे स्ट्राईकवर होता. त्याने एका पाठोपाठ सहा चौकार मारले. संघाने एकाच षटकात २४ धावा केल्या होत्या. त्यामुळे संघाची धावसंख्या १५वरून ३९पर्यंत पोहचली. त्यामुळे हा सामना जिंकणे त्याच्यासाठी सोपे झाले. त्याचबरोबर आता अंकितने एक इतिहास रचला. तो एमपीएल २०२३मध्ये एकाच षटकांत सहा चौकार लगावणारा पहिला फलंदाज ठरला आहे.

अंकित बावणेने अवघ्या १० दिवसांपूर्वी एमपीएलच्या इतिहासातील पहिले शतक झळकावले होते. अंकितेने शतक पूर्ण करण्यासाठी ५९ चेंडूंचा सामना केला. यादरम्यान त्याने ११ चौकार आणि चार षटकार ठोकले. हे त्याचे टी-२०मधील पहिले शतक होते.

# सरफराजच्या समर्थनार्थ एमसीए उतरली मैदानात

**मुंबई : प्रतिनिधी**

सरफराज खानने रणजी ट्रॉफी २०२३च्या मोसमात खूप धावा केल्या, पण असे असूनही तो टीम इंडियामध्ये स्थान मिळवू शकला नाही. त्यानंतर सुनील गावसकर आणि वसीम जाफरसह अनेक दिग्गजांनी संघ निवडीवर प्रश्न उपस्थित केले, तर खराब फिटनेस आणि शिस्तीमुळे सरफराज खानची भारतीय संघात निवड झाली नसल्याचा दावा भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) मीडिया रिपोर्ट्र्समध्ये करण्यात आला आहे. यावर आता मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए)चे स्पष्टीकरण आले आहे.

सरफराज खानने गेल्या मोसमात दिल्लीविरुद्ध शतक झळकावल्यानंतर ड्रेसिंग रूमकडे बोट दाखवत आक्रमकपणे सेलिब्रेशन केले. त्याचे हे कृत्य शिस्तभंग करणारे होते असे मानले गेले. सरफराजची ही पद्धत त्या वेळी स्टेडियममध्ये उपस्थित असलेल्या एका निवड समितीला एक इशारा मानली गेली होती. क्रिकेटपटूच्या जवळच्या एका सूत्राने सोमवारी पीटीआयला सांगितले की, दिल्लीतील रणजी सामन्यादरम्यान सरफराजचे सेलिब्रेशन त्याचे सहकारी आणि प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांच्यासाठी होते. त्याने कधीही क्रिकेटचा अनादर केला नाही भारतीय संघातील तंदुरुस्तीचे प्रमाण १६.५ (यो यो टेस्ट) आहे आणि त्याने ते साध्य केले आहे.

# धोनीच्या व्हायरल व्हिडीओमुळे गेम कंपनीला फायदा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

माजी भारतीय क्रिकेटपटू महेंद्रसिंह धोनीचा विमानातील एक व्हिडीओ व्हायरल झाला होता. या व्हायरल व्हिडीओमुळे एका गेम कंपनीला फायदा झाला आहे. धोनीचा विमानातील व्हिडीओ व्हायरल झाला होता, ज्यामध्ये तो कँडी क्रश गेम खेळताना दिसत होता. यानंतर या गेम कंपनीने मोठा नफा कमावला आहे. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर तीन तासांत ३६ लाख लोकांनी त्यांच्या फोनवर कँडी क्रश गेम डाउनलोड केल्याचा दावा केला जात आहे.

धोनीचा एक व्हिडिओ काही दिवसांपूर्वी व्हायरल झाला होता, ज्यामध्ये एक एअर होस्टेस त्याला फ्लाइटमध्ये चॉकलेट देताना दिसत होती, मात्र धोनीने कँडी क्रश खेळताना लोकांचे लक्ष वेधून घेतले. यानंतर धोनी आणि कँडी क्रश ट्विटरवर ट्रेंड करू लागले आणि व्हिडीओ गेम कंपनीला याचा फायदा झाला.

व्हायरल व्हिडीओमध्ये एमएस धोनी आणि त्याची पत्नी साक्षीसह रविवारी इंडिगोच्या फ्लाइटमध्ये प्रवास करताना दिसला. या दरम्यान क्रिकेटर त्याच्या टॅबवर कँडी क्रश खेळताना दिसला. सोशल मीडियावर हा व्हिडीओ इतका व्हायरल झाला की, ट्विटरवर एमएस धोनीसोबत कँडी क्रश हा हॅशटॅग ट्रेंड होऊ लागला. त्यानंतर कँडी क्रश सागाच्या अधिकृत अकाऊंटवरून दोन ट्वीट करण्यात आले आहेत. पहिल्या ट्वीटमध्ये धोनी आणि इतर यूजर्सबद्दल आदर व्यक्त करण्यात आला आहे आणि दुसऱ्या ट्वीटमध्ये धोनीने हा खेळ खेळल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे.






















**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भाजप उलवे नोड २ यांच्या संयुक्त विद्यमाने गव्हाण विभागातील गरजू विद्यार्थ्यांना मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी मोफत वह्यावाटप करण्यात आले. न्हावा, न्हावाखाडी, शिवाजीनगर, गव्हाण, कोपर, शेलघर, बेलपाडा शाळेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**